रायगड, नवी मुंबई

वर्ष १९ ◆ अंक २२

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ शनिवार, ८ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## ...तेव्हा विरोधक सभागृहातून पळून जातील -ना. रिजिजू



**नवी दिल्ली** : संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांकडून सातत्याने गदारोळ सुरू आहे. यावरून आता केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. "घोषणाबाजी आणि गोंधळ घालणे ही काँग्रेस आणि विरोधी पक्षांची सवय झाली आहे. सरकार मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षण यांसारखी महत्त्वाची विधेयके संसदेत आणत आहे, मात्र काँग्रेसचे नेते सभागृहात गोंधळ घालून विरोध करत आहेत," असे त्यांनी म्हटले. गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत येऊन उत्तर द्यावे, अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे. त्यावर रिजिजू म्हणाले, अमित शाह यांचे नाव ऐकून कट्टरतावादी आणि दहशतवादी थरथर कापतात. ज्या दिवशी गृहमंत्री सभागृहात उत्तर देतील, त्या दिवशी विरोधकांना ना ऐकवले जाणार नाही, ते सभागृहातून पळून जातील, मात्र तेव्हा त्यांना माफी मागावी लागेल.

## अंतरंग


'शेतकरी कर्जमाफीची प्रक्रिया महिनाभरात पूर्ण करू' / २

गटारीच्या मेजवानीसाठी खवय्यांची माशांना पसंती / ६

क्रिकेटर अजिंक्य रहाणेची नवी इनिंग! / ८


# पनवेलमध्ये आज महारोजगार मेळावा; तरुणाईला रोजगाराची सुवर्णसंधी!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींना नामांकित कंपन्या आणि विविध उद्योगांमध्ये रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय जनता पक्ष पनवेलच्या वतीने शनिवारी (दि. ८) खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा सकाळी ९ वाजल्यापासून सुरू होणार आहे.

रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून दहावी, बारावी उत्तीर्ण, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, पदव्युत्तर तसेच विविध कौशल्ये असलेल्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विविध नामांकित कंपन्या व उद्योग या मेळाव्यात सहभागी होणार




असून उमेदवारांना थेट रोजगाराच्या संधी मिळण्याबरोबरच जॉब इंटरव्ह्यू, करिअरच्या संधी आणि उत्तम नेटवर्किंग करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

'रोजगार शोधणाऱ्यांना सुवर्णसंधी' या उद्देशाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधींच्या शोधात असलेल्या तरुणांसाठी हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या महारोजगार मेळाव्यात सहभागी होऊन तरुणाईने आपल्या भविष्याची दिशा निश्चित करावी आणि उपलब्ध रोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**आवश्यक पात्रता**

◆ शालेय व व्यावसायिक शिक्षण : दहावी उत्तीर्ण, बारावी उत्तीर्ण, आयटीआय, डिप्लोमाधारक तसेच कुशल व अकुशल उमेदवार.

◆ पदवी व पदव्युत्तर शिक्षण : कला (बीए/एमए), वाणिज्य (बीकॉम/एमकॉम), विज्ञान (बीएससी/एमएससी), मॅनेजमेंट (बीएमएस/बीबीए/एमबीए), इंजिनिअरिंग (बीई/बीटेक), विधी/कायदा (एएलबी/एलएलएम) आणि इंटिरिअर डिझायनिंग.

# तिसऱ्या मुंबईच्या विकासाला गती

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एमएमआरडीए आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये करार



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) आणि त्यापलीकडील परिसर हा देशाच्या आर्थिक विकासाचे प्रमुख केंद्र बनण्याची क्षमता असलेला प्रदेश आहे. नीती आयोगाने मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासातून सुमारे १.५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था निर्माण करण्याची क्षमता व्यक्त केली आहे. या क्षमतेचा प्रभावी उपयोग करून एमएमआरचा नियोजित, शाश्वत आणि जागतिक दर्जाचा विकास करण्यासाठी राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत भागीदारी करण्यास सुरुवात केली आहे. यातून तिसऱ्या मुंबईच्या विकासाला अधिक गती मिळणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केला.

सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि.७) एमएमआरडीए आणि टेमासेक सुरबाना जुरोंग व मॅपलट्री, सिंगापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, महानगर आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त तथा रायगड-पेण ग्रोथ सेंटरचे अध्यक्ष पी.वेलारसू, टेमासेकचे अध्यक्ष पियुष गुप्ता, टेमासेक पोर्टफोलिओ विकास प्रमुख (आशिया ऑपरेशन्स) दिनेश खन्ना, सुरबाना जुरोंगचे प्रमुख अविनाश मिश्रा, मॅपलट्रीचे वरिष्ठ उपाध्यक्ष अजय कुमार सिंग, रायगड-पेण ग्रोथ सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव मित्तल, संचालक के.व्ही. ब्रह्माजी राव व संबंधित उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या भागीदारीचे स्वागत करताना सांगितले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू आणि मुंबई महानगर प्रदेशातील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे रायगड परिसराच्या विकासाला मोठी चालना मिळत आहे. या पार्श्वभूमीवर रायगड-पेण ग्रोथ सेंटर आणि 'थर्ड मुंबई' अर्थात मुंबई ३.०च्या विकासासाठी सिंगापूरमधील नामांकित संस्था आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसोबत करण्यात आलेले करार महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. प्रस्तावित विकास केंद्रांची एकात्मिक सांगड घालून भविष्यातील आर्थिक विकासासाठी सक्षम परिसंस्था निर्माण करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशाचा नियोजित विस्तार, रोजगाराच्या संधी, गुंतवणूक, उद्योग आणि आधुनिक नागरी सुविधांचा विकास साधला जाणार आहे.

### रायगड-पेण ग्रोथ सेंटरमध्ये १०० एकरांचा विकास प्रकल्प

रायगड पेण ग्रोथ सेंटर लिमिटेड आणि मॅपलट्री यांच्यात १०० एकरांच्या मिश्र-वापर विकास प्रकल्पासाठी सामंजस्य करार करण्यात आले. या प्रकल्पामध्ये मॅपलट्रीकडून विकासासाठी आवश्यक भांडवली व कार्यकारी भांडवल गुंतवणूक, मूल्यनिर्मिती, देश-विदेशातील गुंतवणूकदार आणि जागतिक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. या व्यवहारातून रायगड-पेण ग्रोथ सेंटरमध्ये १.१ अब्ज अमेरिकन डॉलरपेक्षा अधिक परकीय थेट गुंतवणूक येण्याची अपेक्षा आहे. यामुळे परिसरातील औद्योगिक, व्यावसायिक आणि नागरी विकासाला मोठी चालना मिळणार आहे.



# शालेय विद्यार्थ्यांना रेनकोट आणि शिक्षकांना छत्री वाटप

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल शहरात विविध समाजोपयोगी आणि सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमांतर्गत भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत यांच्या माध्यमातून कोळेश्वर विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांसाठी रेनकोट आणि शिक्षकांसाठी छत्री वाटप कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी (दि.७) करण्यात आले होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून सर्व विद्यार्थ्यांना रेनकोट आणि शिक्षकांना छत्र्यांचे वाटप केले. वाढदिवसाचा खर्च टाळून विद्यार्थ्यांच्या आणि समाजाच्या उपयोगास पडतील असे सामाजिक उपक्रम राबवल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी शहर उपाध्यक्ष केदार भगत यांचे मनापासून कौतुक केले व आभार मानले.

या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहर सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर, प्रभाग १९चे अध्यक्ष पवन सोनी, युवा नेते प्रतिक बहिरा, मुख्याध्यापक दशरथ म्हात्रे, हरिश्चंद्र भगत, रामा भगत, युवा मोर्चा सरचिटणीस अनिमेश ओझे यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेल महापालिकेच्या महासभेत ५,०४२.९० कोटींच्या अंदाजपत्रकास मंजुरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि. ७) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांनी सभेमध्ये अंदाजपत्रक सादर केले.

मंचावर उपमहापौर प्रमिला पाटील, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, मुख्य वित्त व लेखा अधिकारी (प्र) संग्राम व्होरकाटे उपस्थित होते, तर सभागृहनेते प्रकाश बिनेदार, महिला बालकल्याण सभापती ममता प्रितम म्हात्रे, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, महापालिका सदस्य, अधिकारी सभागृहात उपस्थित होते.

महापालिकेच्या सन २०२५-२६च्या सुधारित अंदाजपत्रकासह सन २०२६-२७चया मूळ अंदाजपत्रकावर चर्चा करून महासभेने ५,०४२ कोटी ९० लाख ७७ हजार रकमेच्या अंदाजपत्रकास मंजुरी दिली. **(पान २ वर..)**

# मिसिंग लिंकवर अपघातात एकाचा मृत्यू, सहा जण जखमी

**खालापूर** : मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील मिसिंग लिंकच्या बोगद्यात शुक्रवारी (दि.७) रात्री दीडच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात युवकाचा जागीच ठार झाला, तर इतर सहा जण जखमी झाले आहेत.

पुण्याहून मुंबईकडे भरधाव वेगात जात असलेल्या फॉच्युनर कारने (एमएच १४ एमजी ०००७) समोरील भाजीपाला वाहतूक करणाऱ्या मालवाहू टेम्पोला (एमएच ०१ सीआर ७०७५) धडक दिली. या अपघातात तुषार वामन भूमकर (३५, वाकड, पुणे) याचा जागीच मृत्यू झाला, तर कारमधील चालकासह चार जण आणि टेम्पोतील क्लीनर असे सहा जण जखमी झाले आहेत.

# पोलादपुरात दारूसाठा जप्त; दोघे अटकेत, एक जण फरार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने पोलादपूर तालुक्यातील दिविल या गोवा बनावटीच्या मद्यासाठी कुख्यात गावासह कापडे बुद्रुक येथे सुमारे तीन लाखांचा बनावट दारूसाठा जप्त केला. या प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली असून एक आरोपी गुंगारा देत फरार झाला आहे.

या कारवाईत आरोपी विकास कदम आणि होय योगेश चीनकर यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, तर अन्य एक आरोपी फरारी असून त्याचा शोध सुरू असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# गौरी-गणपतीसाठी 'लाल परी' होतेय सज्ज!

## कोकणात एसटीच्या ५,२२० जादा बसेस धावणार



**मुंबई : प्रतिनिधी**

श्री गणरायाचे आगमन १४ सप्टेंबर रोजी होत असून बाप्पाच्या स्वागतासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) सज्ज झाले आहे. कोकणवासीयांसाठी अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या गणेशोत्सवानिमित्त एसटी महामंडळाने यंदा ७ ते २५ सप्टेंबर या कालावधीत ५,२२० जादा बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

गणेशोत्सवाच्या जादा वाहतुकीच्या नियोजनासंदर्भात एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित आढावा बैठकीत ना. सरनाईक बोलत होते. ७ सप्टेंबरपासून मुंबई, ठाणे आणि पालघर विभागातील प्रमुख बसस्थानकांतून या जादा बसेसचे संचालन करण्यात येणार आहे.

जादा बसेसचे आरक्षण npublic.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असून प्रवाशांना बसस्थानकांवर तसेच MSRTC Bus Reservation या अधिकृत मोबाईल ॲपद्वारेही आरक्षण करता येणार आहे. किमान ४० प्रवाशांच्या गटासाठी १० ऑगस्टपासून गट आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गट आरक्षणामध्ये महिला व ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत, तर अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के भाडे सवलत लागू राहणार आहे.




# शेतकरी कर्जमाफीची प्रक्रिया महिनाभरात पूर्ण करू –मुख्यमंत्री

## पहिल्या टप्प्यात ६,२२,२०७ सातबारे झाले कोरे

**मुंबई : प्रतिनिधी**

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील सहा लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये पाच हजार २९ कोटी रुपयांचा पहिला हप्ता जमा करून त्यांची खाती नील करण्यात आली आहेत. येत्या महिनाभरात उर्वरित सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले जाईल", अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.७) दिली.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक पार पडली. या बैठकीला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह सर्व जिल्ह्यांचे पालकमंत्री आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीच्या अंमलबजावणीची विस्तृत माहिती दिली.

कर्जमाफीची संपूर्ण प्रक्रिया महिनाभरात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून जुन्या अनुभवानुसार ८० टक्के काम एका महिन्यात पूर्ण होईल, तर उर्वरित २० टक्के कामाला कागदपत्रांच्या तांत्रिक अडचणींमुळे काहीसा वेळ लागू शकतो. काही प्रकरणांमध्ये मूळ कर्जदाराच्या निधनानंतर वारस हक्काचे (म्युटेशन) फेरफार करून कर्ज रद्द करावे लागत असल्याने प्रशासकीय प्रक्रियेला वेळ लागत आहे. या योजनेत दोनच टप्पे करण्यात आले असून पहिल्या टप्प्यात संपूर्ण कर्जमाफी दिली जात आहे, तर दुसऱ्या टप्प्यात प्रोत्साहनपर रक्कम वितरित केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज मिळण्यात कोणतीही अडचण येणार नसल्याचे स्पष्ट करत मुख्यमंत्र्यांनी सिबिल स्कोअरबाबत पसरणाऱ्या अफवांचे खंडन केले. ही योजना कोणत्याही प्रकारची वन टाईम सेटलमेंट नसून जास्तीचे व्याज बँकांनी रद्द केले आहे आणि उर्वरित संपूर्ण कर्जाची रक्कम शासन स्वतः भरत असल्याने शेतकऱ्यांना सिबिलची कोणतीही अट लागू होणार नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांना राजकीय सल्लागार नेमल्याच्या वृत्तावर मुख्यमंत्री म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसने कोणाला सल्लागार नेमले आहे याची माहिती अद्याप आमच्याकडे आलेली नाही. तो त्यांच्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न असून त्यांच्याशी चर्चा केल्यावरच यावर बोलणे योग्य ठरेल.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी 'जेन–झी'शी संवाद साधल्यावर जर विरोधी पक्षाला सरसंघचालकांचे विचार आणि भूमिका आवडली असेल, तर मी विरोधकांचे मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांना शुभेच्छा देतो, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.

**राज ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर**

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी नाशिक दौऱ्यात तेथील विकासकामे गुजरातच्या कंत्राटदारांना दिली जात असल्याचा केलेला आरोप मुख्यमंत्र्यांनी फेटाळला. देशात किंवा कोणत्याही राज्यात टेंडर प्रक्रिया राबवताना कंत्राटदाराची जात, भाषा किंवा धर्म पाहण्याची कायद्यात पद्धतच नाही. संबंधित कंपनीची आर्थिक क्षमता (बिड कॅपॅसिटी) आणि त्यांची पात्रता (कॉलिफिकेशन) तपासूनच टेंडर दिले जाते. राज्यातील विकासकामांचे टेंडर्स हे अत्यंत पारदर्शक स्पर्धात्मक पद्धतीने मूळ किमतीपेक्षा कमी दराने (बिलो) मंजूर झाले असून त्यावर तीन स्तरांचे गुणवत्ता नियंत्रण (कॉलिटी चेक्स) लावले आहे. काम पूर्ण झाल्यावरच कंत्राटदारांना पैसे दिले जातील तसेच या कंपन्यांच्या मागे असलेल्या मराठी भागीदारांची नावेही आपण उपलब्ध करून देऊ, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# क्लासमध्ये तीन मुलींसोबत केले अश्लील कृत्य, आरोपीविरोधात गुन्हा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्लासमध्ये मुलींसोबत अश्लील कृत्य केल्याचा धक्कादायक प्रकार विचुंबे येथे उघडकीस आला. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी आरोपी अनिकेत अनंत कदम (वय २५, रा. गावदेवी बिल्डिंग, विचुंबे) याला अटक केली.

३ ऑगस्ट रोजी पीडितेला आरोपी अनिकेत कदम याने ऑफिसमध्ये बसायला सांगितले आणि तिच्यासोबत अश्लील कृत्य करून मोबाईल मधील पॉर्न व्हिडिओ पाहण्यास लावल्या. एक ऑगस्ट रोजी दुसऱ्या पिडीत मुलीला ट्युशनला एकटीला बोलावले आणि रिप्रोडक्शन सिस्टीम शिकवण्याच्या पाहण्याने क्लास रूमचा दरवाजा बंद केला आणि तिला पॉर्न व्हिडिओ दाखवला आणि अश्लील कृत्य केले. त्यानंतर आणखी एका पिडीत मुलीसोबत अश्लील चाळे करून तिला पॉर्न व्हिडिओ दाखवली.

या प्रकाराची माहिती दुसऱ्या क्लास टीचर संस्कार कदम यांना सांगितले असता त्याने कोणाला सांगू नको असे सांगितले. त्यामुळे संस्कार कदम याच्या विरोधात देखील खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवेच्या विद्यार्थ्यांची नर्सरीला शैक्षणिक भेट

**उलवे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमधील विद्यार्थ्यांनी शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी वहाळ येथील नर्सरीला शैक्षणिक भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वनस्पती तसेच शेतीविषयक अनेक बाबींची प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी मिळाली.

नर्सरीमध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची फळझाडे, फुलझाडे आणि इतर रोपे पाहिली. तसेच पानांमधील विविधता, रोपांच्या वाढीची प्रक्रिया आणि रोपांची योग्य प्रकारे निगा कशी राखावी, याबाबत माहिती जाणून घेतली.



यावेळी विद्यार्थ्यांना शेतीमध्ये वापरली जाणारी विविध शेती अवजारे प्रत्यक्ष पाहण्याबरोबरच हाताळण्याची संधी मिळाली. विविध प्रकारची खते, त्यांचा वापर, कीटकनाशकांचे प्रकार व त्यांचा उपयोग याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. रोपांची लागवड कशी व कुठे करावी, लागवडीसाठी योग्य जागेची निवड, रोपांची निगा आणि वाढीसाठी आवश्यक घटक याविषयी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून माहिती घेतली. त्यामुळे पाठ्यपुस्तकातील ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाली.

या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शेती, पर्यावरण आणि वृक्षसंवर्धनाविषयी कुतूहल व जागरूकता निर्माण झाली. विविध रोपे आणि शेतीविषयक साधनसामग्री प्रत्यक्ष पाहता व हाताळता आल्याने विद्यार्थ्यांना हा उपक्रम ज्ञानवर्धक व आनंददायी अनुभव देणारा ठरला.

## कोळीवाड्यालगतच्या मोकळ्या जागा मच्छीमार समाजाच्या नावे करण्याची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोळीवाड्यालगतच्या मोकळ्या सरकारी जागा व वन विभागाच्या अख्यत्यीरीतील मासेमारी व्यवसायाच्या जागा मच्छीमार समाजाचे नावे करण्यात यावी, अशी मागणी रायगड जिल्हा कोळी समाज संघाने राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली.

कोळी महासंघाचे अध्यक्ष आमदार रमेश पाटील, भाजप नेते ॲड. आस्वाद पाटील यांच्यासह कोळी समाजाच्या कार्यकर्त्यांनी वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

पिढयान्‌पिढया मासेमारीवर उपजिविका असलेल्या कोळी समाजाकडे एक इंचही जागा नाही व राहत असलेली घरेसुध्दा नावावर झालेली नाहीत. किनाऱ्यावर बऱ्याच अंशी जागा वनविभागाची आहे. या जागेत आम्ही मच्छीमार वर्षभर होडयांची दुरूस्ती, मासे सुकविणे, जाळी विनने आदि कामे केली जातात, मात्र बऱ्याचदा वनविभागाकडून फौजदारी गुन्हे दाखल करून नाहक त्रास दिला जातो. कोळीवाडयालगतच्या मोकळया सरकारी जागा व वन विभागाच्या अख्यत्यारीतील जागा मच्छीमार समाजाचे नावे करून मिळाव्यात, असे या निवेदनात म्हटले आहे.

माजी जिल्हापरिषद सदस्य संजय पाटील, अलिबाग दक्षिण तालुका अध्यक्ष अशोक वारगे, माजी पंचायत सभापती संदीप घरत, अलिबाग तालुका अध्यक्ष मध्य रोशन भगत, कोळी समाजाचे नेते शंकर भगत, प्रवीण तांडेल, निलेश कोंडे तसेच आक्षी, रेवदंडा, थेरोंडा, बोडनी, बोर्ली विभागातील कोळी समाजाचे प्रमुख नेते उपस्थित होते.



# ऐरोली नाट्यगृह, कटाई उन्नत मार्ग सहा महिन्यांत खुला होणार

## वनमंत्री गणेश नाईक यांनी घेतला विकासकामांचा आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी ऐरोली येथील ऐरोली नाट्यगृह तसेच ऐरोली कटाई उन्नत मार्गाच्या कामाचा तसेच ऐरोली सेक्टर २० येथील निर्माणधीन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या कामाचा त्याच प्रमाणे तुर्भे ते खारघर अंडर बायपास कामाचा आढावा घेतला.



अनेक वर्षांपासून रखडलेल्या ऐरोली नाट्यगृहाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. ऐरोली ते कटाई मार्गाच्या कामातील ऐरोली येथील उतार मार्ग कैसे काम देखील पूर्ण तास आले असून हे दोन्ही प्रकल्प सहा महिन्यात नागरिकांसाठी खुले करण्यात येतील अशी माहिती दिली.

या दौऱ्यात महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, पालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, ज्येष्ठ माजी नगरसेवक अनंतसुतार, नगरसेवक अमित मेढकर, नगरसेवक शिवाजी खोपडे नगरसेविका श्रेया जिरगे, नगरसेविका रेश्मा मढवी, नगरसेवक बंडू केणी आदी उपस्थित होते.

ऐरोली सेक्टर ५ येथे नवीन नाट्यगृहाची निर्मिती सुरू झाली. या नाट्यगृहाचे काम पूर्णत्वाकडे आले असून चार ते पाच महिन्यांमध्ये या नाट्यगृहाचे उद्घाटन होणार आहे. ऐरोली सेक्टर १० येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात येतो आहे. या पुतळ्याच्या निर्मितीसाठी वनमंत्री नाईक यांचा आमदार निधी देखील देण्यात आलेला आहे.

वनमंत्री नाईक यांच्या सूचनेनुसार या उन्नत मार्गावर नवी मुंबईकरांसाठी चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी दोन्ही दिशांनी मार्गिका तयार करण्यात येत आहेत. ठाणे–बेलापूर मार्गावरील वाहतूककोंडी कमी करणारा जुईनगर ते खारघर भुयारी मार्गाची पाहणी केल्यानंतर या मार्गाचे काम उत्तम प्रकारे होत असल्याचे नाईक म्हणाले. तुर्भे ते खारघर टनेलचे काम नियोजित वेळेत पूर्ण होण्याबरोबरच या प्रकल्पामुळे खारघरला जाण्यासाठी केवळ आठ मिनिटे लागणार आहेत.२०२८ पर्यंत या मार्गाचे काम पूर्ण होईल, अशा विश्वास वनमंत्री नाईक यांनी व्यक्त केला.

***नवी मुंबईकरांना पाण्याचा त्रास होऊ देणार नाही!***

*मोरबे धरण हे नवी मुंबईकरांसाठी आहे. धरणातील अतिरिक्त पाणी काही कालावधीसाठी इतर ठिकाणी देता येईल परंतु नवी मुंबईकरांसाठी पाणीटंचाई निर्माण होईल किंवा त्यांना त्रास होईल असा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे वनमंत्री गणेश नाईक यांनी स्पष्ट केले.*

## पान १ वरुन

### पनवेल महापालिकेच्या महासभेत ५,०४२.९० कोटींच्या अंदाजपत्रकास मंजुरी

३० मार्च २०२६ रोजी आयुक्त मंगेश चितळे यांनी सन २०२५–२६चे सुधारित ४,११४ कोटी एक लाख ९८ हजार रकमेचे अंदाजपत्रक तसेच सन २०२६–२७चे मूळ ४,८५३ कोटी ९० लाख ७७ हजार रकमेचे अंदाजपत्रक स्थायी समितीपुढे सादर केले होते. त्यानंतर ७ जुलै रोजी झालेल्या स्थायी समितीच्या विशेष सभेत सदस्यांनी सुचविलेल्या सुधारणा विचारात घेऊन स्थायी समितीने ५,०४२ कोटी ९० लाख ७७ हजार रकमेचे सुधारित मूळ अंदाजपत्रक महासभेपुढे सादर केले होते. त्यास शुक्रवारी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली.

**जमेच्या प्रमुख बाबी**

अंदाजपत्रकातील जमेच्या प्रमुख बाबींमध्ये महानगरपालिका करातून ₹१,९५२.४५ कोटी, वस्तू व सेवा कर (जीएसटी) अनुदान ₹५८२.९४ कोटी, विकास शुल्क ₹१५९.३१ कोटी, वित्त आयोग अनुदान ₹१७० कोटी, अमृत–२ योजनेसाठी ₹११६.७२ कोटी, इतर अनुदाने व भांडवली जमा ₹२४९.३४ कोटी तसेच इतर महसूल व आरंभीच्या शिल्लकीसह एकूण ₹५,०४२.९० कोटी इतक्या उत्पन्नाचा समावेश आहे.

**विभागांसाठी तरतूद**

विकासाभिमुख या अंदाजपत्रकात विविध विभागांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली आहे. बांधकाम विभागासाठी ₹१,६०७.२१ कोटी, पाणीपुरवठा विभागासाठी ₹४७२.३८ कोटी, घनकचरा व्यवस्थापनासाठी ₹३१७.८२ कोटी, वैद्यकीय आरोग्य सेवेसाठी ₹१९४.५६ कोटी, प्राथमिक शिक्षणासाठी ₹१७४.०५ कोटी, भुयारी गटार व मलनिस्सारणासाठी ₹१६३.७३ कोटी, विद्युत व्यवस्थेसाठी ₹१४६.९३ कोटी, अग्निशमन व सुरक्षा व्यवस्थापनासाठी ₹८२.७१ कोटी, विकास आराखडा व भूसंपादनासाठी ₹७० कोटी, तर पर्यावरण संवर्धनासाठी ₹२१.१४ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**विकासकामांसाठी तरतूद**

प्रमुख विकासकामांमध्ये शिलार धरण प्रकल्पासाठी ₹१५० कोटी, हिरकणी माता व बालसंगोपन रुग्णालयासाठी ₹७० कोटी, प्राथमिक शाळा बांधकामासाठी ₹७६.४७ कोटी, रस्त्यांचे काँक्रीटीकरण व डांबरीकरणासाठी ₹३५८.५० कोटी, बाग व उद्यान विकासासाठी ₹१५८.८३ कोटी, दैनिक बाजार विकासासाठी ₹६४.५० कोटी, गावठाण परिसरातील पायाभूत सुविधा उभारणीसाठी ₹६१.०४ कोटी, स्मशानभूमी व कब्रस्तान विकासासाठी ₹५० कोटी, नदी संवर्धन व सुशोभीकरणासाठी ₹१०.८० कोटी, प्रतिकात्मक वास्तू उभारणीसाठी ₹२५ कोटी, वेस्ट टू एनर्जी प्रकल्पासाठी ₹२६.१३ कोटी, नवीन अग्निशमन केंद्रासाठी ₹४० कोटी, अग्निशमन वाहन खरेदीसाठी ₹३१.५० कोटी, सौर ऊर्जा प्रकल्पासाठी ₹१३.५० कोटी आणि नवीन जलशुद्धीकरण केंद्रासाठी ₹१६ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

सामाजिक बांधिलकी जपत दिव्यांग कल्याण निधीसाठी ₹४८.९१ कोटी, मागासवर्ग कल्याण निधीसाठी ₹४६ कोटी आणि महिला व बालकल्याण निधीसाठी ₹३१.६५ कोटी इतकी स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे.

यावेळी सदस्यांनी अंदाजपत्रकावर आपली मते मांडली. चर्चेनंतर अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात आली. शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे, नागरिकाभिमुख सुविधा वाढविणारे आणि भविष्यातील पायाभूत विकासाचा मजबूत पाया घालणारे हे अंदाजपत्रक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. सभेच्या शेवटी महापौरांनी उपस्थित सदस्यांचे आभार मानत मंजूर अंदाजपत्रकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन केले.

# हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता मोहिमेतून नवी मुंबईत स्वच्छतेसह आरोग्यावर भर

**नवी मुंबई : बातमीदार**

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' अंतर्गत केंद्र सरकारच्या 'हर घर तिरंगा' मोहीमेच्या अनुषंगाने देशातील सुपर स्वच्छ शहरांमध्ये नामांकित असलेल्या नवी मुंबई शहरातही महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने 'हर घर तिरंगा हर घर स्वच्छता' अभियान व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत विविध भागांतील दुर्लक्षित भागांच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्यात असून त्यासोबतच सोसायट्या, वसाहती याठिकाणी कच–याचे ४ प्रकारे वर्गीकरण करण्याविषयी नागरिकांना माहिती देऊन त्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.

या अंतर्गत घणसोली सेक्टर ३० येथील यशोदीप हाईट्स सोसायटी तसेच सेक्टर ८ येथील गामी रिजन सोसायटी याठिकाणी सोसायटीमधील रहिवाशी तसेच सोसायटीचे स्वच्छताकर्मी यांना कचरा वर्गीकरणाविषयी माहिती देऊन त्याची अंमलबजावणी करण्याचे सांगण्यात आले.

सेक्टर ६ समर्थनगर घणसोली भागात स्वच्छता मोहीमेप्रमाणेच आरोग्य विभागाच्या वतीने मलेरिया–डेंग्यू प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात आली. यामध्ये स्वच्छताकर्मींनी परिसर स्वच्छ करतानाच पाणी साचलेल्या ठिकाणी डासांची उत्पत्ती होत असल्याने उघड्यावर पडलेले टायर्स व इतर साहित्य जमा करण्यात आले. अशाच प्रकारच्या स्वच्छता मोहीमा करावेगाव, आग्रोळीगाव, दिघा विभागातील व्यावसायिक क्षेत्र, सेक्टर १६ जय भवानी मार्केट ऐरोली, जुहूगाव, महापेगाव याठिकाणी राबविण्यात आल्या.

'सफाई अपनाओ बिमारी भगाओ' अभियानांतर्गत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने सखोल स्वच्छता मोहीमा तसेच आरोग्य विभागामार्फत मलेरिया, डेंग्यू प्रतिबंधात्मक मोहीमा तसेच मूषक नियंत्रण मोहीमा संयुक्तपणे राबविण्यात येत आहेत. अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजेश म्हात्रे व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली संयुक्तपणे या विशेष सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत असून नागरिकांचाही या मोहीमांना चांगला प्रतिसाद लाभत आहे.

तरी नवी मुंबईकर नागरिकांनी पावसाळी कालावधीत साथरोगांची संभाव्य शक्यता लक्षात घेऊन आपल्या घरात व घराभोवताली पाणी साचून राहिल्यास होणारी डासउत्पत्ती स्थाने होऊ न देण्याची काळजी घ्यावी व तापसदृश्य स्थिती असल्यास तत्परतेने वैद्यकीय सल्ला घ्यावा असे आवाहन महापौर श्रीम. सुजाता पाटील आणि आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# सागरी हद्दीत घुसखोरी करणाऱ्या परराज्यातील मच्छीमार बोटींवर करडी नजर ठेवण्यासाठी नऊ ड्रोन तैनात

**उरण : प्रतिनिधी**

१ ऑगस्टपासून राज्याच्या जलाधिक्षेत्राच्या १२ नॉटिकल सागरी मैलाच्या बाहेर फक्त ॲक्सेस पासधारक मच्छीमार बोटींनाच मासेमारीसाठी परवानगी दिली आहे, मात्र या दरम्यान परराज्यातील मच्छीमार बोटींची महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत प्रवेश करणाऱ्या घुसखोरांवर करडी नजर ठेवण्यासाठी ड्रोन आणि कोस्ट गार्डची मदत घेतली जात असल्याची माहिती मत्स्य



विभागाचे उपायुक्त नवनाथ भदुले यांनी दिली.

यावर्षी पावसाळी मासेमारी बंदीचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आला आहे.मत्स्य उत्पादन वाढीसाठी हा निर्णय घेण्यात आला होता.मात्र मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी एक ऑगस्टपासूनच राज्याच्या जलाधिक्षेत्राच्या १२ नॉटिकल सागरी मैलाच्या बाहेर ॲक्सेस पासधारक मच्छीमार बोटींना मासेमारीला परवानगी देण्याची घोषणा केली आहे.दरम्यान एक ऑगस्टपासून राज्याच्या जलाधिक्षेत्राच्या १२ नॉटिकल सागरी मैलाच्या बाहेर ॲक्सेस पासधारक मच्छीमार बोटींना मासेमारीला परवानगी दिल्याने गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आदी परराज्यातील मच्छीमार बोटी महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत घुसखोरी करून मासेमारी करण्याची भीती मच्छीमारांकडून व्यक्त केली जात आहे.

मात्र महाराष्ट्रातील जलाधिक्षेत्रात परराज्यातील मच्छीमारांची घुसखोरी होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. राज्याच्या जलाधिक्षेत्राच्या १२ नॉटिकल सागरी मैलाच्या आत घुसखोरी करणाऱ्यांवर करडी नजर ठेवण्यासाठी ९ ड्रोन तैनात करण्यात आले आहेत.तसेच घुसखोरी रोखण्यासाठी कोस्ट गार्डचीही मदत घेतली जात असल्याची माहिती मत्स्य विभागाचे उपायुक्त नवनाथ भदुले यांनी दिली. राज्यातील मच्छीमारांना राज्याच्या जलाधिक्षेत्राच्या १२ नॉटिकल सागरी मैलाच्या बाहेर मासेमारी करणाऱ्या ६५० मच्छीमार बोटींना ॲक्सेस पास दिले आहेत.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

## ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात शालोपयोगी साहित्याचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयाता श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळामार्फत शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच सामाजिक बांधिलकी जपत भारतीय जनता पार्टीचे सदस्य जयेंद शेळके यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सर्व विद्याथ्यारना मोफत स्पार्क्स कंपनीचे सँडल्स वाटप केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष, संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला हातभार लागावा व त्यांचे मनोबल वाढावे या उद्देशानेसर्व विद्यार्थ्यांना दोन गणवेश, वह्या, दप्तर व टिफिन बॉक्सया साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

विद्यालयाच्या सभागृहात आयोजित या समारंभाचे अध्यक्षपदआमदार प्रशांत ठाकूर यांनी भूषवले.या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून संस्थेचे सदस्य ॲडव्होकेट राहुल घरत आणि माध्यमिक शिक्षण निरीक्षक संतोष चव्हाण उपस्थित होते. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा भाजप पनवेलतालुका संघटक प्रभाकर जोशी, सचिव सचिन वास्कर, कामगार सेना अध्यक्ष जयदास तेलवणे, खारघर-तळोजा अल्पसंख्यांक अध्यक्ष इरशाद शेख, जयेंद शेळके यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यालयातशैक्षणिक, क्रीडा व विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळवणाऱ्या विद्याथ्यारचे त्यांनी विशेष अभिनंदन करून सर्वांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




## पनवेल येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे,न्यू इंग्लिश स्कूल, मार्केट यार्ड, पनवेल येथे रोटरी क्लब ऑफ पनवेलतर्फे देण्यात आलेल्या स्किल लॅब, रायगड विभागीय कार्यालयातर्फे देण्यात आलेल्या दोन इंट्रॅक्टिव्ह पॅनलचे उदघाटन व लायनेस क्लब पनवेलतर्फे देण्यात आलेल्या गणवेशांचे वाटप कार्यक्रम नुकताच यशस्वीरित्या संपन्न झाला.

सदरच्या कार्यक्रमात विद्यालयातील गरीब,गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना देखील स्पर्धेच्या युगात टिकून उंच भरारी घेता यावी म्हणून रोटरी क्लब ऑफ पनवेल मार्फत विद्यालयात निर्माण केलेल्या स्किल लॅब व त्यामधील आलेक्सा, ड्रोन, रोबोटीक्स अशी विविध माध्यमे, रायगड विभागीय कार्यालयातर्फे विद्यालयास प्रदान केलेल्या २ इंटरॅक्टिव्ह पॅनल यांचे उदघाटन , त्याच प्रमाणे लायनेस क्लब तर्फे देण्यात आलेल्या ५० गणवेशांचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष तथा स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन तसेच ज्येष्ठ सदस्य स्थानिक स्कूल कमिटी जे. एम.म्हात्रे, नवनिर्वाचित स्कूल कमिटी सदस्य नारायण शेठ घरत, रोटरी क्लब पनवेलची प्रेसिडेंट ॲड.चंद्रशेखर वाडकर, माजी प्रांतपाल जिल्हा ३१३१ डॉ. परमार, डॉ. सौ. परमार, डॉ. निकम, कांडपिले साहेब, लायनेस क्लब पनवेल च्या प्रेसिडेंटसुमन डोले, .अहुजा मॅडम, कॅनरा बँक करंजाडे शाखेच्या शाखा व्यवस्थापिका अंचल श्रीवास्तव, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष ॲड. विजय गडगे आणि खजिनदार प्रमोद पाटील उपस्थित होते.

श्री. परमार साहेब यांनी तसेच जे. एम. म्हात्रे यांनी रयत सेवक निष्ठावंत व त्याग वृत्ती असणारे सेवक आहेत. विद्यालयाला मिळालेल्या या शैक्षणिक सुविधाचा व विद्यार्थ्यांना मिळालेल्या गणवेशाचा वापर आपल्या शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी करावा आणि दात्यानी केलेल्या मदतीस सार्थ ठरावे असा अभ्यास करावा असा मोलाचा प्रेरणादायी संदेश दिला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख पाटील एम. एम.यांनी केले .



## वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसाठी स्नेहभोजन आणि संगीत मैफिल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड कामगार आघाडीच्या वतीने पनवेल विधानसभेचे आमदार आणि महाराष्ट प्रदेश सचिव प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत रिटघर-चिंचवली येथील वात्सल्य वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसाठी स्नेहभोजन आणि संगीत मैफिलीचा सुरेल कार्यक्रम अत्यंत उत्साहात व आनंददायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन कामगार आघाडीचे जिल्हा अध्यक्ष रवी नाईक यांच्या माध्यमातून करण्यात आले होते.

या प्रसंगी वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना उदंड आणि निरोगी आयुष्यासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या. संगीत मैफिलीतील बहारदार गाण्यांनी वृद्धाश्रमातील वातावरण प्रसन्न झाले होते, तर उपस्थित सर्व ज्येष्ठांनी आपुलकीच्या वातावरणात स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

यावेळी भारतीय भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड कामगार आघाडीचे अध्यक्ष रवी नाईक, उपाध्यक्षहरेश्वर पोळेकर, उपाध्यक्ष ॲड्. माधवराव खेरडे, सरचिटणीस मोतीलालकोळी, खजिनदार जगदीश म्हात्रे, सह सचीव ललिता शेवाळे, कार्यालयीन सचिव मधुकर उरणकर, प्रसिद्धी प्रमुख राजपाल शेगोकार, माजी पोलीस अधिकारी अरुण धांदर, श्याम भगत, रोहन पोहेरकर, दिलीप आदार्ळकर, परशुराम म्हात्रे,ॲड. ऋषभ पाटील, ज्ञानेश्वर निकम, नंदा धांदर, रेखाताई कुरेकर, केतन शिंदे, वात्सल्य वृद्धाश्रमाचे संस्थापक नरेश भेंडे, जयश्री भेंडे यांच्यासह यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## पनवेल, मानसरोवर रेल्वेस्थानकात जीवनरक्षक एईडी मशीन कार्यान्वित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सार्वजनिक हिताच्या उपक्रमांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत रिव्हरसाईड बी अँड जे हॉस्पिटलच्या वतीने डॉ. विनय जसवाल, डॉ. प्रितीश बागुल आणि डॉ. अरुणकुमार भगत यांनी ऑटोमेटेड ऑटोमेटेड एक्सटर्नल डिफिब्रिलेटर



(एईडी) मशीन भेट दिले आहे. सार्वजनिक हित लक्षात घेऊन हे जीवनरक्षक उपकरण पनवेल आणि मानसरोवर रेल्वे स्थानकात कार्यान्वित करण्यात येणार आहे.

अचानक हृदयक्रिया बंद पडणे ही अत्यंत गंभीर आणि जीवघेणी आपत्कालीन परिस्थिती आहे. अशा वेळी प्रत्येक सेकंद महत्त्वाचा असतो. रुग्णाला वेळेत सीपीआर आणि एईडी उपलब्ध झाल्यास त्याचे प्राण वाचण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढू शकते. त्यामुळे गर्दीची ठिकाणे असलेल्या रेल्वे स्थानकांवर एईडी उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.एईडी हे हृदयाची विद्युत क्रिया तपासून आवश्यक असल्यास विद्युत धक्का देऊन हृदयाची नियमित गती पूर्ववत करण्यास मदत करणारे जीवनरक्षक उपकरण आहे. हे उपकरण वापरण्यास तुलनेने सोपे असून, त्यामध्ये देण्यात येणाऱ्या ध्वनी सूचनांचे पालन करून प्रशिक्षित किंवा प्राथमिक मार्गदर्शन घेतलेली व्यक्ती आपत्कालीन परिस्थितीत त्याचा वापर करू शकते.

अचानक हृदयक्रिया बंद पडण्याची घटना कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही ठिकाणी आणि कोणत्याही वेळी घडू शकते. अशा वेळी रुग्णवाहिका किंवा वैद्यकीय मदत पोहोचेपर्यंतचा कालावधी अत्यंत निर्णायक ठरतो. सीपीआर आणि एईडीचा तातडीने वापर केल्यास रुग्णाला जीवनदान मिळण्याची शक्यता वाढते. रेल्वे स्थानके, विमानतळ, मॉल, शाळा-महाविद्यालये, क्रीडा संकुले, कार्यालये, मंदिरे तसेच विविध सार्वजनिक सभास्थळांवर एईडी उपलब्ध असणे त्यामुळे अत्यंत उपयुक्त ठरते.

## तीन दिवस सेवा संकल्प अभियान

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसा निमित्ताने भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक १४तर्फे सेवा संकल्प अभियानाचे आयोजन ५ ते ७ ऑगस्ट असे तीन दिवस करण्यात आले होते. या अभियानाच्या दुसऱ्या दिवशी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थिती दर्शवत या सेवा संकल्प अभियानाला शुभेच्छा देत मयुरेश नेतकर यांचे कौतुक केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी मयुरेश नेतकर हे करत असलेल्या सेवेबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले. या सेवा संकल्प अभियाना अंतर्गत नागरिकांना एनसीएमसी कार्ड, आयुष्यमान कार्ड, जेष्ठ नागरिक कार्ड काढून देण्यात आले. प्रभाग १४ मध्ये पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीदरम्यान भाजपाला अपयश आलेले असले तरी देखील आमच्या कार्यकर्त्यांकडून जनतेची अविरतपणे सेवा सुरूच असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

यावेळी भाजपचे नगरसेवक सुमित झुंजारराव, जिल्हा उपाध्यक्ष भाजपा उत्तर रायगडचे मयुरेश नेतकर, रेणुका नेतकर, माजी नगरसेविका सारिका भगत, सतीश पाटील यांच्यासह शासकीय अधिकारी, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मयुरेश नेतकर यांनी कार्यालयात जनसेवेची खिडकी सुरू करणार असल्याचे सांगितले.



## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात एम-पॉवर आदित्य बिर्ला ट्रस्टतर्फे कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात दिनांक ६ ऑगस्ट २०२६ या दिवशी मानसिक आरोग्य जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता ११ वी वाणिज्य व विज्ञानच्या विद्यार्थ्यांसाठी आज एम -पॉवर आदित्य बिर्ला ट्रस्ट यांच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मानसिक



आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, भावनिक सक्षमता वाढवणे आणि सकारात्मक जीवन दृष्टिकोन विकसित करणे हा होता.

कार्यशाळे दरम्यान तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याचे महत्त्व, तणाव व परीक्षेचे दडपण हाताळण्याचे प्रभावी मार्ग, सकारात्मक विचारसरणी, आत्मविश्वास, भावनांवर नियंत्रण तसेच गरज भासल्यास समुपदेशन घेण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून चर्चेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करत त्यांना मानसिकदृष्ट्या सक्षम आणि निरोगी राहण्यासाठी उपयुक्त सूचना दिल्या.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी तसेच मानसिक आरोग्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही कार्यशाळा अत्यंत माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि उपयुक्त ठरली. या कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी प्राचार्य निशा नायर यांचे आभार मानले.



**पनवेल : भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड कामगार आघाडीच्या वतीने भाजप महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार आणि प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शुक्रवारी करंजाडे ग्रामपंचायतीच्या वतीने आदिवासी बांधवांना डस्टबीनचे वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, भाजप नेते कर्णा शेलार, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.**

## न्यायालयाच्या आवारात आरोपीकडून पोलिसांवर हल्ला

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल न्यायालयाच्या आवारात रिमांडसाठी आणलेल्या आरोपीने कोर्टाच्या आवारात पोलीस अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून एका पोलिसावर हल्ला केला तसेच पोलिसांच्या तोंडावर लाथ मारून सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी सदीक अख्तर मोहम्मद खान (रा. कल्याण रोड, भिवंडी) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात पाच ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

५ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास आरोपी सादिक खान याला रिमांडसाठी पनवेल न्यायालयात खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस हजर करत होते. पोलिसांनी त्याला एका गुन्ह्यामध्ये अटक केली होती. यावेळी त्याच्या नातेवाईकांना कोर्टाच्या आत येऊन न दिल्याचा राग आल्याने आरोपीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस पथक आणि पोलीस हवालदार यांना शिवीगाळ केली आणि एका पोलिस हवालदाराने त्याला पकडून ठेवण्याचा राग आल्याने त्याने पोलिसाच्या तोंडावर लाथ मारली. आणि सरकारी कामात अडथळा आणला.

**उरण : रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनियर कॉलेज, दहागाव विभाग जासईचे माजी प्राचार्य अरुण घाग यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील. सोबत रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख, डी.पी. सोनवणे, राजन घरत तसेच एस.पी. ठाकरे उपस्थित होते.**



## संपादकीय

# समजून घेणारा संवाद

सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी मुंबईत जेन-झी आणि जेन-अल्फा या दोन पिढ्यांशी साधलेला संवाद हा केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जेन-झीपर्यंत पोहोचण्याचा कार्यक्रम म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. तो नव्या पिढीला समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

**प्रश्न विचारणारा किंवा आंदोलन करणारा तरुण राष्ट्रविरोधी नव्हे. लोकशाहीत आंदोलन हा संघर्षाचा नव्हे तर संवादाचाच एक मार्ग असू शकतो. मात्र आंदोलनाची पद्धतही लोकशाही मूल्यांना धरून असली पाहिजे. ती समाजात फूट निर्माण करणारी नसावी, असा समतोल दृष्टिकोन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी गुरुवारी मांडला. भागवत यांनी देशभरातील जेन-झी आणि जेन-अल्फा या दोन पिढ्यांमधील सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांशी मुंबईतील 'नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर' येथे साधलेला संवाद याच दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो. नीट पेपरफुटी प्रकरणानंतर देशभरात झालेल्या तरुणांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हा संवाद आयोजित करण्यात आला होता. जेन-झींनी आंदोलन करायला नको होते असे आपण म्हणणार नाही. मात्र कुठलेही आंदोलन व्यक्तीविरोधात नको, तर व्यवस्था सुधारण्यासाठी असायला हवे असेही भागवत यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यांची भूमिका लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत अशीच आहे. यावेळी आजच्या तरुण पिढीबद्दल भागवतांनी केलेले निरीक्षण तर विशेष उल्लेखनीय आहे. जेन-झी ही आज्ञा स्वीकारणारी नव्हे, तर 'का?' असा प्रश्न विचारणारी पिढी आहे. तिला केवळ उपदेश नको तर तर्कसंगत उत्तर हवे आहे. या मानसिकतेचा स्वीकार करणाऱ्या भागवत यांनी या पिढीविषयी विश्वास व्यक्त केला. आजच्या या तरुणांकडे संशयाच्या नजरेने पाहण्याऐवजी त्यांच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवणे हीच त्यांच्याशी जोडले जाण्याची पहिली पायरी आहे. देशाच्या भावी पिढीशी संवाद साधताना केवळ संस्कार करण्याची भाषा पुरेशी नाही तर या पिढीचे प्रश्न ऐकण्याची, त्यांच्या अस्वस्थतेमागची कारणे समजून घेण्याची आणि त्यांच्याशी तर्काच्या भाषेत संवाद साधण्याची तयारीही नक्कीच आवश्यक आहे. शिक्षणाच्या प्रश्नावर भागवतांनी यावेळी व्यक्त केलेली भूमिका याविषयीच्या व्यापक चर्चेला दिशा देणारी आहे. शाळांमध्ये स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, शिक्षकांची उपलब्धता यांसारख्या मूलभूत सुविधा नसतील तर केवळ मोठमोठ्या शैक्षणिक घोषणा उपयोगाच्या ठरणार नाहीत. देशात शिक्षकांची सुमारे दहा लाख पदे रिक्त आहेत याचाही भागवत यांनी यावेळी उल्लेख केला. शिक्षण हा नफा कमावण्याचा उद्योग नसून प्रत्येक मुलाचा अधिकार आहे ही भूमिका समाजानेही गांभीर्याने स्वीकारली पाहिजे. शिक्षणासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद सहा टक्यांपर्यंत वाढविण्याच्या त्यांच्या सूचनेमागे शिक्षणाला राष्ट्रनिर्मितीच्या केंद्रस्थानी ठेवण्याचा विचार आहे. त्याचबरोबर रोजगार म्हणजे केवळ नोकरी नव्हे तर उद्योजकतेच्या संधीही आहेत याकडेही भागवतांनी लक्ष वेधले. स्टार्टअप, नवकल्पना, कौशल्य आणि स्वतःचा व्यवसाय उभारण्याची क्षमता यांना रोजगारनिर्मितीच्या चौकटीत स्थान देणे आवश्यक आहे. ही बाब आजच्या भारतीय तरुणांच्या बदलत्या आकांक्षांच्या संदर्भात विशेष महत्त्वाची आहे. सोशल मीडियावर निर्बंध लादण्याऐवजी समाजानेच जबाबदार वापराची संस्कृती निर्माण करावी हा भागवतांचा विचार आजच्या डिजिटल युगाला अतिशय साजेसा आहे. सोशल मीडियावर दिसणाऱ्या कोणत्याही माहितीवर पडताळणी केल्याशिवाय विश्वास ठेवू नये. बनावट व्हिडिओ, बदललेले चेहरे आणि आवाज यांच्या माध्यमातून खोटी माहिती निर्माण करणे आता सहज शक्य आहे. त्यामुळे खरेखोटे तपासून घेण्याची सवय तरुणांना असणे अत्यावश्यक झाले आहे. जुन्या पिढीने नव्या पिढीकडून काही शिकण्याची तयारी ठेवली तरच पिढ्यांमधील दरी कमी होईल. आणि यातूनच संपूर्ण भारतीय समाजाचे सामर्थ्य खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मितीत परिवर्तित होईल.**

# रत्नागिरीतील सड्यांवर रानफुलांचा रंगोत्सव...





हिरवी नाजुक रेशिम पाती,
दोन बाजूनी सळसळती
नीळ नीळुली एक पाकळी,
पराग पिवळे झगमगती

कवयित्री इंदिरा संत यांच्या कवितेच्या या ओळी वाचताना डोळ्यांसमोर जो निसर्गाचा विलोभनीय कॅनव्हास उभा राहतो, तोच कॅनव्हास सध्या रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक गावांमधील सड्यांवर प्रत्यक्षात अवतरला आहे. पावसाच्या अधून-मधून बरसणाऱ्या सरी ओसरल्यावर, इथल्या तांबड्या मातीच्या सड्यांनी जणू हिरवा शालू नेसला आहे. त्यावर विलोभनीय रानफुलांची रंगीबेरंगी 'वेलबुट्टी' साकारली आहे.

साताऱ्याचे 'कास पठार' आणि कोल्हापूरचे 'मसाई पठार' यांनी आजवर आपल्या रानफुलांच्या सौंदर्याने पर्यटकांना भुरळ घातली आहे, पण आता रत्नागिरी परिसरातील सडेही "आम्ही देखील पाठीमागे नाही, येवा आमचो सौंदर्य न्याहाळा!" अशी प्रेमळ साद पर्यटकांना घालत आहेत. साडवली, जैतापूर, देवाचे गोठणे, नाटे अशा २० ते २२हून अधिक सड्यांवर सध्या निसर्गाने विविध रंगांच्या रानफुलांची अक्षरशः उधळण केली आहे.

या सड्यांवर सध्या दीपकाडी, कंदीलपुष्प, कुमुदिनी, रानहळद, विविध प्रकारच्या अमरी, चोहळा, परजीवी वाढणारे आकर्षक तुरे, केना अशा कितीतरी रानफुलांनी बहर आणला आहे.

सह्याद्री संकल्प सोसायटीचे कार्यकारी संचालक प्रतीक मोरे या सौंदर्याविषयी सांगताना म्हणतात, "साडवलीच्या सड्यावर एकदांडी (Dipcadi concanense) ही कंदवर्गीय वनस्पती सध्या फुलली आहे. या प्रजातीचा 'देवरुखेन्स' हा एक नवा वाणही समोर आला आहे. पावसाळ्यातील एक-दोन महिने आपले मनमोहक रूप दाखवून या वनस्पती पुन्हा जमिनीत सुप्तावस्थेत जातात."

चोहळा ओहोळांच्या कडेला वाढणारी 'चोहळा (Curcuma scaposa) ही आलेवर्गीय वनस्पती सध्या निसर्गाच्या कुशीत फूलली आहे. औषधी गुणधर्म असलेली ही वनस्पती आता दुर्मिळ आणि धोकाग्रस्त प्रजातींमध्ये मोडते.

गुलाबी कापरी कमळ (Cleome angulata) जैतापूर, नाटे आणि धाऊलवल्ली अशा १० ते १२ गावांच्या परिसरातील सड्यांवर 'कापरी कमळ' पाहायला मिळते. डॉ. अरुण चांदोरे आणि डॉ. श्रीरंग यादव यांनी शोधून काढलेली ही वनस्पती अतिशय सुंदर आहे. तिला पाणतिळवण असेही म्हणतात. तिची नाजूक गुलाबी फुले वाऱ्यावर डोलताना पाहून त्या आकर्षक सौंदर्यात हरवायला होतं. ती डोलताना कापत असल्याचा भास होतो. एकाचवेळी ताटवे फूलल्याने संपूर्ण सडे गुलाबी रंगात न्हाऊन निघाले आहेत.

गुलाबी भुईचक्र वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रताप नाइकवडे सांगतात, साडवली आणि आंबोलीच्या सड्यांवर (Iphigenia devrukhensis) म्हणजेच 'गुलाबी भुईचक्र' ही वनस्पती आढळते. दीपकाडीच्या आधी फूलणारी ही अतिशय सुंदर फुले, सड्यावर जणू एक गुलाबी चादरच अंथरतात. तिला तिची एक वेगळी आणि स्वतंत्र ओळख आता प्राप्त झाली आहे. हे सौंदर्य केवळ पाहण्यासाठी नाही, तर जपण्यासाठीही आहे. याच उद्देशाने सह्याद्री संकल्प सोसायटीतर्फे गेली अनेक वर्षे 'फुलोत्सव' साजरा केला जात आहे. यातून विद्यार्थ्यांना या नैसर्गिक अधिवासाची आणि फुलांची शास्त्रीय माहिती दिली जाते. या सड्यांची आणि दुर्मीळ रानफुलांची जपणूक करणे ही आता आपल्या सर्वांचीच सामूहिक जबाबदारी बनली आहे.

निसर्गाचे हे अद्भुत आणि निखळ सौंदर्य डोळे भरून पाहताना, मनातील कोलाहल शांत होतो आणि

मलाही वाटे लहान होऊन,
तुझ्याहून ही लहान रे
तुझ्या संगे सडा रहावे,
विसरुन शाळा, घर सारे
ओठांवर सहजच
या ओळी रेंगाळू लागतात..

**-प्रशांत सातपुते,** जिल्हा माहिती कार्यालय, रत्नागिरी

# कथालेखिका, कादंबरीकार सुमती क्षेत्रमाडे



कथालेखिका, कादंबरीकार सुमती बाळकृष्ण क्षेत्रमाडे यांचा आज स्मृतिदिन. सुमती क्षेत्रमाडे या मराठी कथालेखिका, कादंबरीकार होत्या. त्यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१६ रोजी रत्नागिरीतील झापडे या गावी झाला. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण नाशिक येथे झाले. त्यांनी पुण्याच्या बी. जे. मेडिकल महाविद्यालयातून मुंबई विद्यापीठाची एलसीपीएस ही वैद्यकशास्त्रातील पदवी मिळविली. त्यानंतर त्यांनी काही वर्षे बडोदे संस्थानात वैद्यकीय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्या वैद्यकीय उच्च शिक्षणासाठी आयर्लंडला गेल्या (१९४८).

तिथे रोटंडा विद्यापीठाची बालरोग आणि प्रसूतिशास्त्रातील एल.एम. ही पदवी त्यांनी घेतली(१९५०). त्यानंतर त्यांनी कोल्हापूर येथे खासगी दवाखाना सुरू केला. अखेरपर्यंत त्यांचे वास्तव्य कोल्हापुरातच होते. वैद्यकीय सेवा करीत असतानाच त्यांनी आपला लेखन-वाचनाचा छंद जोपासला आणि कथा-लेखनास सुरुवात केली. त्यांची 'वादळ' ही पहिली कथा स्त्री मासिकात प्रसिद्ध झाली. पुढे स्त्री व माहेर मासिकांतून त्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध होऊ लागल्या. नंतर त्या कादंबरी लेखनाकडे वळल्या.

सुमतीबाईंनी विपुल लेखन केले. त्यांचे वीस कथासंग्रह, पंधरा कादंबऱ्या, कुमार वाङ्मय व दोन नाटके असे विविध साहित्यप्रकारांना स्पर्श करणारे लेखन आहे. या साहित्यसंपदेपैकी 'प्रीतिस्वप्न' (१९५४), 'बीजेची कोर' (१९६२) हे कथासंग्रह, 'महाश्वेता' (१९६०), 'मैथिली' (१९६३), 'श्रावणधारा' (१९६४), 'मेघमल्हार' (१९६८), 'अनुहार' (१९७६), 'युगंधरा' (१९७९), 'वादळवीज' (१९८१), 'पांचाली' (१९८४), 'तपस्या' (१९८४) इत्यादी कादंबऱ्या आणि 'भैरवी' (१९६८) व 'मीच जाहले माझी मृगया' (१९८७) ही नाटके, या साहित्यकृती उल्लेखनीय आहेत. त्यांनी युरोपचा स्वेच्छा दौरा केला होता (१९७२). अशा या श्रेष्ठ लेखिकेचे ८ ऑगस्ट १९९८ रोजी निधन झाले. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपवर आता वय करावं लागणार व्हेरिफाय!

तुमच्याही व्हॉट्सॲपवर अचानक वयाची विचारणा करणारा ऑप्शन आलाय का? जर हो, तर घाबरून जाण्याचे कारण नाही. लोकप्रिय मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲपवर सध्या एका नवीन फिचरची जोरदार चर्चा सुरू आहे. भारतामध्ये लवकरच कडक होणाऱ्या एका नव्या कायद्याच्या पार्श्वभूमीवर व्हॉट्सॲप युजर्सचे वय आणि जन्मतारीख तपासत आहे. हे फिचर नेमके कशाला आले आहे आणि याचा तुमच्या चॅटिंगवर काय परिणाम होईल, जाणून घेऊया...





सध्या व्हॉट्सॲपने युजर्ससाठी एक नवीन एज व्हेरिफाय ऑप्शन चाचणीच्या स्वरूपात आणले आहे. यामध्ये युजर्सना त्यांची जन्मतारीख विचारली जात आहे. विशेष म्हणजे, सध्याच्या घडीला हे फिचर पूर्णपणे ऐच्छिक असून कोणत्याही युजरसाठी वय पडताळणी करणे सक्तीचे करण्यात आलेले नाही, मात्र येत्या काळात भारतातील डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण म्हणजेच डीपीडीपी कायदा लागू होणार असल्याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सनी आतापासूनच तयारी सुरू केली आहे.

भारतात डेटा सुरक्षेसाठी अत्यंत कडक असा 'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन कायदा २०२३' मंजूर करण्यात आला आहे. या कायद्यानुसार १८ वर्षांखालील प्रत्येक व्यक्तीला 'लहान मूल' मानले गेले आहे. या नव्या नियमांमुळे कोणत्याही ऑनलाईन प्लॅटफॉर्मला लहान मुलांचा डेटा गोळा करण्यासाठी किंवा त्यावर प्रक्रिया करण्यासाठी त्यांच्या पालकांची किंवा कायदेशीर पालकांची प्रमाणित संमती घेणे अनिवार्य असणार आहे.

या नवीन नियमांमुळे व्हॉट्सॲप किंवा अन्य सोशल मीडिया कंपन्यांसमोर एक मोठे आव्हान उभे ठाकले आहे. केवळ पालकांची परवानगी मागून चालणार नाही, तर तो पालक खरोखरच सज्ञान आहे की नाही आणि तोच त्या मुलाचा कायदेशीर पालक आहे का, याची खात्रीही प्लॅटफॉर्मला करावी लागणार आहे. यासाठी व्हॉट्सॲप आणि इतर टेक कंपन्या भविष्यात सरकारी कागदपत्रांच्या आधारे किंवा प्लॅटफॉर्मवरील युजरच्या आधीच्या रेकॉर्डवरून ही पडताळणी करू शकतात.

या संपूर्ण प्रकरणावर कंपनीची मूळ कंपनी असलेल्या 'मेटा'ने स्पष्ट केले आहे की, युजर्सची गोपनीयता ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. वयाची ही माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाईल आणि ती इतर कोणत्याही युजरसोबत शेअर केली जाणार नाही. व्हॉट्सॲपच्या रोजच्या वापरावर किंवा युझर एक्सपिरियन्सवर याचा कोणताही वाईट परिणाम होणार नाही.

# सिनेसृष्टीतील बहुरंगी व्यक्तिमत्व दादा कोंडके



## निमित्त

कृष्णा कोंडके ऊर्फ दादा कोंडके (८ ऑगस्ट १९३२-१४ मार्च १९९८) हे मराठी अभिनेते व चित्रपट-निर्माते होते. मराठी चित्रपटांतल्या विनोदी ढंगातील संवादफेकीमुळे त्यांच्या भूमिका लोकप्रिय झाल्या. अभिनयासोबतच त्यांनी प्रामुख्याने मराठी भाषेतील व सोबतच हिंदी व गुजराती भाषांतील चित्रपटांची निर्मितीही केली. प्रेक्षकांना नेमके काय हवे आहे याची चांगलीच जाण त्यांना होती.

विच्छा माझी पुरी करा या वसंत सबनीस लिखित वगनाट्यामुळे कोंडके अभिनेता म्हणून प्रसिद्धीस आले. इ.स. १९६९ साली भालजी पेंढारकरांच्या तांबडी माती चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले. सोंगाड्या (इ.स. १९७१), आंधळा मारतो डोळा (इ.स. १९७३), पांडू हवालदार (इ.स. १९७५), राम राम गंगाराम (इ.स. १९७७), बोट लावीन तिथे गुदगुल्या (इ.स. १९७८) हे त्यांचे विशेष गाजलेले चित्रपट होत. 'अपना बझार' मध्ये काम करता करता दादा सेवादलाकडे आकर्षित झाले.

दादांचे पितासमान गुरु बाबा उर्फ भालजी पेंढारकर यांचा तांबडी माती हा त्यांचा पहिला चित्रपट. या चित्रपटानंतर दादांनी कधीच मागे वळून बघितले नाही. 'सोंगाड्या' ही दादांची पहिली निर्मिती. हा चित्रपट खूप गाजला व त्यांचा जीवनातील मैलाचा दगड ठरला. दादांनी मराठीत एकूण १६ चित्रपटांची निर्मिती केली. विशेष म्हणजे सर्व चित्रपट रौप्यमहोत्सवी ठरले. हा विक्रमामुळे त्यांचे नाव गिनीज बुकात नोंदले गेले. त्यांनी हिंदीतसुद्धा चार चित्रपटांची निर्मिती केली. उषा चव्हाण ही त्यांची आवडती तारका त्यांच्या अनेक चित्रपटात नायिका होती.

दादांचा जन्म लालबागचा. गिरणी-कामगाराच्या पोटी ८ ऑगस्ट १९३२ रोजी गोकुळाष्टमीत लाभलेल्या या पुत्ररत्नाचे कृष्णा म्हणून नामकरण करण्यात आले. पोरक्या वयातच या कृष्णाच्या लीला उसळून बाहेर येऊ लागल्या. शाळकरी वयातच त्यांना गल्लीतले 'दादा' म्हणून ओळखले जात असे. ही बिरुदावली नंतर कायम राहिली. ज्येष्ठ बंधूंच्या अपकाली निधनामुळे घर सांभाळायची जबाबदारी आली. 'अपना बाजार'मध्ये दरमहा साठ रुपयाने कामावर असतानाच दादा सेवादलाच्या बँडमध्ये काम करू लागले. कलेचा नाद शांत बसू देईना म्हणून प्रसिद्ध गाण्यांची विडंबने करणे, विचित्र गाणी रचणे, त्यांना चाली लावणे हे फावल्या वेळेतले छंद त्यांनी जोपासले. सेवादलात असतानाच त्यांची गाठ निळू फुले, राम नगरकर यांच्याशी पडली. आणि सेवादलाच्या नाटकांत दादा छोटी-मोठी कामे करू लागले. लहानपणापासून खोड्याळ (काहीसे मवाली) असलेल्या दादांनी 'अपना बाजार' येथे नोकरी केली. सोडावॉटर बाटल्या, दगड-विटांनी मारामारी केल्याचे दादांनी एका मुलाखतीत सांगितले आहे. एका वर्षातच त्यांच्या कुटुंबातल्या प्रमुख व्यक्तींशी ते काळाने दुरावले व तेव्हापासून एकटे पडलेल्या दादा कोंडकेंनी जीवन हे खेळकरपणे घालवण्याचा निश्चय केला. नायगाव परिसरात बँडवाले दादा या नावाने त्यांना लोकं ओळखू लागले. तेथेच त्यांना जीवाभावाचे मित्र मिळाले.

जून १९७१मध्ये दादांची प्रमुख भूमिका असलेला सोंगाड्या चित्रपट प्रदर्शित झाला. 'सोंगाड्या'ला सुरुवातीला सिनेमागृह मिळत नव्हते. नंतर तो तुफान गाजला. इतका की बऱ्याच सिनेमागृहांनी जेमतेम चालत असलेला देव आनंदचा 'तेरे मेरे सपने' उतरवला आणि सोंगाड्या लावला. १९७२ साली 'एकटा जीव सदाशिव' प्रदर्शित झाला. या चित्रपटाची हाईप इतकी झाली होती, की खुद्द राज कपूरने आपल्या पोराला लाँच करताना चित्रपटाची तारीख पुढे ढकलली आणि 'बॉबी' पाच महिने उशिरा प्रदर्शित झाला. त्यामागोमाग आलेल्या 'आंधळा मारतो डोळा'ने लाईम-लाईट पुन्हा दादा कोंडकेंवर आणला. १९७५मध्ये 'पांडू हवालदार'च्या रुपात दादा पुन्हा पडद्यावर आले. कधी नव्हे ते जेम्स बाँडचा सिनेमा महाराष्ट्रात फ्लॉप गेला. त्याचबरोबर दादांचा आलेख चढत गेला. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# डोक्याखाली जाड उशी घेऊन झोपणे नुकसानकारक

झोपताना जास्तीत जास्त लोक डोक्याखाली उशी घेतात. काही लोकांना उशीशिवाय झोपच येत नाही, पण असं करणं आरोग्यासाठी किती नुकसानकारक असतं हे अनेकांना माहीत नसतं. या संदर्भात एमबीबीएस, एमडी जनरल मेडिसिन, सल्लागार फिजिशियन डॉ. पॅलेटी सिवा कार्तिक रेड्डी यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



कंटेन्ट क्रिएटर डॉ. मेहस यांच्या मते, उशीचा सतत वापर केल्याने त्वचेवर सुरकुत्या पडू शकतात, कारण उशीमुळे चेहऱ्यावर दबाव पडतो, जे लोक उशीचा वापर करत नाहीत, त्यांना ही समस्या होत नाही. उशी न वापरल्याने पिंपल्स येण्याची समस्याही कमी होते, कारण उशीचे कव्हर नेहमी धुतले जात नाहीत. यावेळी डॉ. मेहस यांनी एक व्हिडीओ शेअर करत आपण उशीचा वापर चुकीच्या पद्धतीने कसा करतो हे दाखवलं आहे.

डॉ. पॅलेटी सिवा कार्तिक रेड्डी यांनी उंच उशीवर झोपल्यास तुमच्या त्वचेवर काय परिणाम होऊ शकतो हे स्पष्ट केले आहे. उंच उशी घेतल्यानं सर्वात पहिला आजार म्हणजे मानेचा त्रास. उशी घेतल्याने मानदुखी सतत चालू राहते. यासाठी तुम्ही नेहमी लहान उशी अथवा अत्यंत मऊ उशीचा वापर करावा तसेच उशीमुळे रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होऊ शकतो. डॉ. रेड्डी पुढे सांगतात, सतत उशीच्या वापरामुळे त्वचेला कोरडेपणा, संक्रमण होण्याची अधिक शक्यता असते.

डॉ. रेड्डी खालील शिफारस करतात की, अशी उशी निवडा जी मानेच्या मणक्यावरील ताण कमी करेल. तरीही जर मानेच्या वेदना कायम राहिल्यास डॉक्टरांकडे जाणे फायदेशीर आहे. डॉक्टर रेड्डी सांगतात, अपुऱ्या पद्धतीच्या उशीचा आधार एखाद्या व्यक्तीच्या मणक्यावर गंभीर परिणाम करू शकतो. ही झीज होऊन मानेच्या डिस्क्स आणि सांध्यांवर परिणाम होतो, ज्यामुळे वेदना होतात. उंच उशीचा वापर केल्याने मणक्याची झीज वाढू शकते, ज्यामुळे स्पॉन्डिलेसिस होण्याचा धोका वाढतो. उंच उशीच्या वापरामुळे सतत मानदुखी, डोकेदुखी आणि खांदेदुखी हा रोजचा त्रास उद्भवू शकतो. यामुळे झोपेमध्ये व्यत्यय, मूडवर परिणाम होऊ शकतो.

डॉ. रेड्डी यांच्या म्हणण्यानुसार उशीचे प्राथमिक कार्य म्हणजे मानेच्या नैसर्गिक वक्रला आधार देणे. डोके आणि मान तटस्थ स्थितीत ठेवणाऱ्या उशा शोधा. मोठ्या उशीचा परिणाम हा मेंदूतील रक्तप्रवाहावरही होतो. त्यामुळे ही सवय तुम्ही त्वरित सोडावी.

# पशुधन विमा योजना योजनेला रायगडात चांगला प्रतिसाद -वैकुंठ पाटील

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत राज्यात पशुधन विमा योजना राबवण्यात येत आहे. रायगड जिल्हयात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. जिल्हयातील जास्तीतजास्त पशुपालकांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी रायगड जिल्हा परीषद सर्वतोपरी सहकार्याची भूमिका घेतली आहे , अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांनी दिली.




या योजनेची माहिती देण्यासाठी शुक्रवारी (दि. ७) कुंटे बाग येथील जिल्हा परिषद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत वैकुंठ पाटील यांनी ही माहिती दिली. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्पप्रमुख प्रियदर्शिनी मोरे, पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त रत्नाकर काळे आदि उपस्थित होते.

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत अल्प हप्त्यात जनावरांना विमा संरक्षण दिले जात असून, नुकसान झाल्यास थेट बँक खात्यात नुकसानभरपाई जमा केली जाते. या योजनेत देशी व संकरित दुभत्या गायी, म्हशी, बैल, रेडे तसेच शेळी-मेंढ्यांचा समावेश आहे. एका कुटुंबातील जास्तीत जास्त दहा जनावरांचा विमा उतरवता येतो. दुभती गाय किंवा बैलासाठी कमाल ७० हजार रुपये, तर दुभती म्हैस किंवा रेड्यासाठी ८० हजार रुपये आणि शेळी-मेंढीसाठी ७ हजार रुपये इतके विमा संरक्षण उपलब्ध आहे. रायगड जिल्हयातून या योजनेसाठी चांगला प्रतिसाद मिळतो आहे. आतापर्यंत ३ हजार ५०० हून अधिक पशुपालकांनी आपल्या जनारांचा विमा काढण्यासाठी नोंदणी केली आहे, अशी माहिती वैकुंठ पाटील यांनी दिली.

योजनेत विमा हप्त्याच्या केवळ १५ टक्के रक्कम लाभार्थ्याला भरावी लागते, तर उर्वरित ८५ टक्के प्रीमियम राज्य व केंद्र शासनाकडून अनुदान स्वरूपात दिला जातो. विमा कालावधी एक ते तीन वर्षांपर्यंत निवडण्याची सुविधा आहे. पशुधनाचा मृत्यू झाल्यास २४ तासांच्या आत विमा कंपनीला माहिती देणे आवश्यक असून, शवविच्छेदन आणि इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर १५ दिवसांच्या आत नुकसानभरपाईची रक्कम थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात जमा केली जाते, अशी माहिती वैकुंठ पाटील यांनी दिली

> **पशुधन विमा योजनेस रायगड जिल्हयात चांगला प्रतिसाद मिळतो आहे. ही योजना प्रभावीपणे राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. या योजनेत पशुपालकांना जी १५ टक्के विमा रक्कम भरावयाची आहे ती भरण्याचा विचार जिल्हा परीषद करते आहे. यावर लवकरच सकारात्मक निर्णय होईल. अधिक माहितीसाठी पशुपालकांनी जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी, तालुका पशुसंवर्धन अधिकारी, ग्रामसेवक किंवा गो-मित्र यांच्याशी संपर्क साधावा.**
> **-वैकुंठ पाटील,** कृषी व पशुसंवर्धन सभापती, राजिप

# काशिद समुद्रकिनारी शुकशुकाट
## पर्यटन व्यवसायावर परिणाम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या काशिद समुद्र किनाऱ्यावर सध्या पावसाळ्यामुळे संपूर्ण शुकशुकाट पसरला आहे. वर्षभर पर्यटकांच्या गर्दीने गजबजून जाणारा हा समुद्रकिनारा सध्या ओस पडला असून, समुद्रातील धोकादायक लाटा आणि खराब हवामानामुळे काशिद ग्रामपंचायतीने पर्यटकांना समुद्रात पोहण्यास सक्त मनाई केली आहे. याबाबतचे इशारा फलक समुद्रकिनाऱ्यालगत विविध ठिकाणी लावण्यात आले आहेत.



काशिद समुद्रकिनारा हा रायगड जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील लोकप्रिय पर्यटनस्थळांपैकी एक आहे. स्वच्छ पांढरी वाळू, निळाशार समुद्र, हिरव्यागार झाडीने वेढलेला परिसर आणि शांत वातावरणामुळे वर्षभर हजारो पर्यटक येथे भेट देतात. विशेषतः शनिवार-रविवार व सुट्ट्यांच्या काळात किनाऱ्यावर पर्यटकांची मोठी गर्दी असते.

पावसाळ्यात मात्र समुद्र खवळलेला असल्याने मोठ्या लाटा आणि वेगवान प्रवाहामुळे समुद्रात पोहणे अत्यंत धोकादायक ठरते. या पार्श्वभूमीवर काशिद ग्रामपंचायतीने १५ जून २०२६ पासून पावसाळा संपेपर्यंत समुद्रात पोहण्यास बंदी घालण्यात आली असून, किनाऱ्यावर धोक्याचे इशारा फलक लावून पर्यटकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

पर्यटकांची वर्दळ थांबल्याने समुद्रकिनाऱ्यालगत उभारलेले खाद्यपदार्थांचे स्टॉल, लहान-मोठी दुकाने तसेच इतर पर्यटन व्यवसायही बहुतांश बंद आहेत. त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांच्या उत्पन्नावरही परिणाम झाला आहे. दरवर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीत अशीच परिस्थिती निर्माण होत असली तरी पर्यटकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत ग्रामपंचायतीने घेतलेल्या निर्णयाचे स्थानिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

स्थानिक प्रशासनाने पर्यटकांना पावसाळ्याच्या काळात समुद्रकिनाऱ्यावर फिरताना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे तसेच समुद्रात उतरण्याचा कोणताही प्रयत्न न करण्याचे आवाहन केले आहे. सध्या नेहमी पर्यटकांच्या गर्दीने गजबजणारा काशिद समुद्रकिनारा शांत आणि ओसाड दिसत असून, पर्यटन हंगाम पुन्हा सुरू होण्याची स्थानिकांना प्रतीक्षा लागली आहे.

# पळस्पे-इंदापूर मार्गावरील दुहेरी टोलविरोधात केंद्र सरकारकडे दाद

## खासदार तटकरेंचे केंद्रीय मंत्री गडकरींना निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

मुंबईगोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील पळस्पे- इंदापूर मार्गावर अल्प अंतरात उभारण्यात आलेल्या दोन टोलनाक्यांमुळे कोकणातील नागरिक, प्रवासी आणि वाहनचालकांवर अन्यायकारक आर्थिक भार पडत असल्याचा मुद्दा पुन्हा एकदा केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून देण्यात आला आहे. या संदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना नवी दिल्ली येथे सविस्तर निवेदन खासदार सुनिल तटकरे यांनी दिले.



खारपाडा आणि सुकेळी येथे अवघ्या सुमारे ४० किलोमीटर अंतरावर दोन टोलनाके उभारण्यात आल्याकडे लक्ष वेधण्यात आले. दोन्ही टोलनाक्यांमधील हे अल्प अंतर विद्यमान टोल धोरणाच्या तसेच जनहिताच्या भावनेशी विसंगत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर, दोन्ही टोलनाक्यांपैकी एक टोलनाका हटवून त्यांच्या दरम्यान किमान ६० किलोमीटरचे अंतर राखण्यात यावे, अशी आग्रही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यामुळे कोकणातील नागरिक, नियमित प्रवासी आणि मालवाहतूक करणाऱ्या वाहनचालकांवरील अतिरिक्त आर्थिक भार कमी होण्यास मदत होईल, असा दावा करण्यात आला.

तसेच राष्ट्रीय महामार्गावरील टोल व्यवस्थेत न्याय्य, पारदर्शक आणि जनहिताला प्राधान्य देणारे बदल करण्याची आवश्यकता अधोरेखित करत केंद्र शासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंतीही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे करण्यात आली.या जनहिताच्या प्रश्नावर केंद्र शासन सकारात्मक भूमिका घेऊन पळस्पेइंदापूर मार्गावरील दुहेरी टोलवसुलीच्या समस्येवर न्यायिक तोडगा काढेल, असा विश्वास खासदार तटकरे यांनी व्यक्त केला.

# मोटरसायकल आणि कार अपघातात दोघे जखमी



**महाड : प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर वहूर गाव हद्दीत आज संध्याकाळी ५:१५ वाजण्याच्या सुमारास मोटरसायकलला एका कारची मागून जोरात धडक बसल्याने मोटर सायकल वरील दोन प्रवासी गंभीर रीत्य जखमी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आज सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास मुंबई गोवा महामार्गावरील गावाच्या हद्दीत एका कारची मोटरसायकलला धडक देऊन झालेला अपघातात दोन जण जखमी झाले आहेत. मनिष मधुभाई पवार - ३३रा.डोंबिवली ठाणे हा आपल्या ताब्यातील टाटा पंच कार क्रमांक एम एच ०१-ई आर -९८६६ महाड बाजू कडून मुंबई कडे मुंबई -गोवा राष्ट्रीय महामार्गाने घेऊन जात असताना मौजे वहूर गावचे हद्दीत आले वेळी चालक याने रस्त्याच्या परस्थिती कडे दुर्लक्ष करून व अती वेगाने चालवून समोर जात असणाऱ्या होंडा शाईन मोटार सायकल क्रमांक एम एच १२-के एक्स-१७९७ हिला मागून जोराची धडक दिली.

या अपघातात मोटार सायकल चालक प्रमोद मनोहर काळे रा. महाड आणि तुलसीदास रामचंद्र महाडीक रा. महाड हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळतात महामार्ग वाहतूक पोलीस शाखा महाड यांनी घटनास्थळी धाव घेतली जखमींना उपचारासाठी महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

# चांभार्लीत सोसायटीमध्ये सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चांभार्ली गावाजवळील गुरुद्वाराच्या पाठीमागे असलेल्या इंद्रप्रस्थ सोसायटीत सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंद्रप्रस्थ सोसायटीतील प्लॉट क्रमांक १२ येथे राहणारे संजय भरत नंदेश्वर (वय ५७) हे काही काळासाठी घराबाहेर गेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करून सोन्याचा ऐवज लंपास केला. चोरीस गेलेल्या ऐवजामध्ये सुमारे ८० हजार रुपये किमतीचा सोन्याचा हार, १० हजार रुपये किमतीची सोन्याची नाणी तसेच १५ हजार रुपये किमतीची चार सोन्याची नाणी असा एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल आहे.या घटनेचा तपास रसायनी पोलीस ठाण्याचे निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.


## जाहीर नोटीस

जाहिराती मध्ये नमुद **सोसायटी ग्रीन वूड फेज वन को.ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, कानपोली हुदुटाणे** या सोसायटीमध्ये **सदनिकाचे वॉटरप्रुफींगचे काम** करायचे आहे.

तरी इच्छुक सरकारमान्य ठेकेदारांच्या निविदा ई-मेल द्वारे दिनांक १७/०८/२६ पर्यंत स्वीकारल्या जातील...

ई-मेल आयडी : greenwoodsocietyphase1@gmail.com

**सही/-** अध्यक्ष  **सही/-** सचिव  **सही/-** खजिनदार

सर्व्हे नं. १०/४, १०/५, ११/३, १२/२, १३/३, आणि १६/३, हुदुटाणे गाव, पोस्ट पडघे, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०८


# रामधरणेश्वर धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मानी-वायशेत येथील रामधरणेश्वर धरणात पोहण्यासाठी उतरलेल्या २६ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. ५) सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

नेहाल विजय शेट्ठी (वय २६, रा. मेटपाडा, अलिबाग) असे मृत तरुणाचे नाव आहे. नेहाल हा मित्रांसमवेत रामधरणेश्वर धरण परिसरात फिरण्यासाठी गेला होता. यावेळी पोहण्यासाठी पाण्यात उतरल्यावर पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो अचानक खोल पाण्यात गेला आणि बुडाला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. नेहाल याला तातडीने पाण्याबाहेर काढून अलिबाग जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

या प्रकरणी पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, पावसाळ्यात धरणे, तलाव, नद्या आणि ओढ्यांमधील पाण्याची खोली व प्रवाहाचा अंदाज येत नसल्याने अशा ठिकाणी पोहण्याचे धाडस करू नये, असे आवाहन प्रशासनाने नागरिकांना केले आहे.


## जाहीर नोटीस
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर यांचे न्यायालयात**

तालुका खालापूर, जि. रायगड

क्र. जन्म-मृत्यू/रजि./एस. आर. /२०२६

१) श्रीम. नंदा कुंडलिक चोरघे, .................. **वादी**
रा. हातनोली, पो. चौक, ता. खालापूर जि. रायगड

**विरुध्द**

२) निबंधक जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, ...................... **प्रतिवादी**
ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी, ता. खालापूर, जि. रायगड

**जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्रीम. नंदा कुंडलिक चोरगे (अपिलार्थी) यांनी त्यांचे भाऊ कै. दामोदर काळुराम भोसले मृत्यू दिनांक ०८/१०/१९८४ रोजी मौजे तांबाटी, ता. खालापूर, जि. रायगड येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्यांचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येतील याची नोंद घ्यावी. सदरची जाहीर नोटीस आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली आहे.

ठिकाण - खालापूर
दिनांक - ०७/०८ /२०२६

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर


# कशेडी घाटात दुचाकीची रेलिंगला धडक; चालकाचा मृत्यू



**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर पोलादपूर नजिकच्या कशेडी घाटामध्ये मंगळवारी रात्री खेडकडे जाणाऱ्या भरधाव यामाहा मोटर सायकलची घाट रस्त्यालगतच्या रेलिंगला जोरदार धडक बसली. अपघातामध्ये मोटरसायकलस्वार जागीच ठार झाला.

महाड तालुक्यातील वाळण झोळीचा कोंड येथील रहिवाशी तरुण राज विनोद मोरे (वय २३ वर्ष) हा त्याच्या ताब्यातील यामाहा कंपनीची आर १५ मोटर सायकल घेऊन ४ जुलै रोजी रात्री महाड कडून खेडच्या दिशेने जात असताना कशेडी घाटातील चोळई गावच्या हद्दीत सायली हॉटेल समोर आल्यानंतर रस्त्याच्या वळणावर मोटर सायकलने भरधाव वेगाने रस्त्यालगतच्या रेलिंगला ठोकर दिली. या अपघातामध्ये मोटार सायकलस्वार तरूण गंभीर जखमी झाल्याने उपचारासाठी ॲम्ब्युलन्सने ग्रामीण रुग्णालय महाड येथे दाखल केले. यावेळी राज विनोद मोरे या मोटारसायकलस्वाराला डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले.पोलादपूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.


## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल
**४७१, कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड**
**ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com**

**परिशिष्ट IV**

**ताबा सूचना**

**[नियम-८(१)]**
**(स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी,
निम्नस्वाक्षरीकार यांनी, **दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि.**, चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (५४/२००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून **दि. ०५.०५.२०२६** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार **श्री. वामन जानू पाटील, सौ. संगिता वामन पाटील, श्री. जनार्दन मारुती जाधव आणि श्री. राजेंद्र गणपत दुंडुसकर** यांच्याकडे सूचनेमध्ये उल्लेख केलेली **दि. ३१.०३.२०२६** रोजीनुसारची रक्कम **रु. १,२३,६९५ (रुपये एक लाख तेवीस हजार सहाशे पंचाण्णव मात्र)** व **दि. ०१.०४.२०२६** पासून संपूर्ण परताव्यापर्यंतचे पुढील व्याज परतावा करण्याची मागणी केली होती.

कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की, याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियमन, २००२ च्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **दि. ०६ ऑगस्ट, २०२६** रोजी **सांकेतिक ताबा** घेतला आहे.

विशेषतः वरील उल्लेखित कर्जदार/ गहाणवटदार/ जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार हा **दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., कापड बाजार शाखेच्या** रक्कम **रु. १,२३,६९५ (रुपये एक लाख तेवीस हजार सहाशे पंचाण्णव मात्र)** आणि त्यावरील व्याजाच्या प्रभारास अधीन असेल.

**तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम (१३) च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार / जामीनदार / गहाणवटदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.**

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

वामन जानू पाटील आणि सौ. संगिता वामन पाटील यांच्या नावे असलेल्या, ग्रुप ग्राम पंचायत देवळोली, गाव देवळोली, पोस्ट रसायनी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, नवी मुंबई, महाराष्ट्र राज्य - ४१०२०७ येथे स्थित घर क्र. १५४ चे सर्व खंड आणि तुकडे.

**ठिकाण: देवळोली / पनवेल**
**दिनांक: ०६.०८.२०२६**

**सही/-**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**
**प्राधिकृत अधिकारी**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीसमोर लिहीलेल्या मालक / कब्जेदारांकडून आमचे अशिल कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत. सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांकडून ठरलेल्या किंमतीच्या रक्कमेपैकी बयाणा स्विकारुन लेखी करार करणार आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चिंचवली तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| मालक/ कब्जेदाराचे नांव | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री. गोटीराम आत्माराम पाटील, श्री. नरेश आत्माराम पाटील, श्री. गणेश आत्माराम पाटील | ५६ | २/अ | ०-९८-२० पो.ख. ०-०८-५० एकुण १-०६-७० **पैकी ०-८०-००** | १६.२६ |

वर नमूद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिंच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद् झाले पासून १४ दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत. अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन, आमचे अशिल वर उल्लेख करण्यात आलेल्या सर्व इसमांबरोबर सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग, मागाहून मुदतीनंतर उपस्थीत करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण - पनवेल.
दिनांक - ०८/०८/२०२६.

**सही/-**
**श्री. कुलदिप रा. पाटील**
( वकील उच्च न्यायालय)

कार्यालयिन पत्ता : शॉप नं. ४, यशोकिरण को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, सावरकर चौकाजवळ, पनवेल ४१० २०६.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मालक **श्री. प्रकाश खंडू फडके, राहणार : ३७५ / बी, दत्त मंदिर जवळ, मौजे विहीघर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६** यांच्या हिश्श्यातील मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत असून, आमचे अशिल यांनी सदर मिळकत खरेदीखत करून विकत घेण्याचे ठरविले आहे . तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत . सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे : -

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे विहीघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भूधारणा पध्दती भोगवटदार वर्ग | क्षेत्रफळ हेक्टर आर | आकारणी रू. | पै. |
|---|---|---|---|---|
| ७१ | १ | ०-१९-१५ | २ | ६० |
| | पोटखराबा | ०-००-२५ | | |
| | **एकुण** | **०-१९-४०** | **२** | **६०** |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०७/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. रोशन कचेर पाटील**
बी. कॉम., एल. एल. बी.

पत्ता :- ऑफिस नं. ०६, पहिला मजला, ए विंग, यशोकिरण सोसायटी, सावरकर चौक, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड - ४१० २०६. संपर्क क्र. : ९८९२४९४९६७

# पार्लियामेंटम युवा संसद स्पर्धेत के.सी. लॉ कॉलेज टीम विजेती

**नवी पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय (BCT College of Law), नवी पनवेल येथे वादविवाद मंडळाच्या वतीने आयोजित "पार्लियामेंटम युवा संसद स्पर्धा २०२६" या दोन दिवसीय राज्यस्तरीय स्पर्धेचा समारोप उत्साहात झाला. महाराष्ट्रातील विविध विधी महाविद्यालयांतील १६ संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. प्राथमिक फेरीतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर ८ संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला.यामध्ये के. सी. लॉ कॉलेज (टीम TC–D)ने विजेतेपद पटकावत चषक, ₹२५,००० रुपयांचा धनादेश, सुवर्णपदक मिळवले.





उपांत्य फेरीत सर्व संघांनी संसदीय परंपरा, प्रभावी वक्तृत्व, कायदेशीर मुद्द्यांची सखोल मांडणी आणि संसदीय नियमांचे काटेकोर पालन करत उत्कृष्ट कामगिरी केली. उपांत्य फेरीचे परीक्षण ॲड. शिवानी घरत यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी संसदीय चर्चेचा उच्च दर्जा कायम राखत प्रभावी सादरीकरण केले.

उपांत्य फेरीनंतर के. सी. कॉलेज ऑफ लॉ, एच. व्ही. पी. एस. कॉलेज ऑफ लॉ, सी. एस. एम. यू. आणि डी. वाय. पाटील स्कूल ऑफ लॉ या चार संघांनी अंतिम फेरीत स्थान मिळविले. अंतिम फेरीचे परीक्षण ॲड. अशोक येन्दे यांनी केले. या फेरीत संसदीय कामकाज, विधेयकावरील सखोल चर्चा, प्रभावी युक्तिवाद आणि लोकशाही मूल्यांचे उत्कृष्ट दर्शन घडले.

यंदाच्या स्पर्धेचा विषय "द प्रोटेक्शन ऑफ मायनर्स (सोशल मीडिया रेग्युलेशन) बिल, २०२६" हा होता. या विषयावर विद्यार्थ्यांनी डिजिटल युगातील अल्पवयीनांच्या संरक्षणासाठी आवश्यक कायदेशीर उपाययोजना, सामाजिक माध्यमांचा जबाबदारीने वापर तसेच समकालीन सामाजिक व कायदेशीर प्रश्नांवर अभ्यासपूर्ण मते मांडली.

स्पर्धेच्या अंतिम निकालात के. सी. लॉ कॉलेज (टीम TC–D)ने विजेतेपद पटकावत चषक, २५,००० रुपयांचा धनादेश, सुवर्णपदके व प्रमाणपत्रे मिळविली. एच.व्ही.पी.एस. कॉलेज ऑफ लॉ (टीम TC–B)ने उपविजेतेपद मिळवत चषक, ₹१५,००० रुपयांचा धनादेश, रौप्यपदके आणि प्रमाणपत्रे पटकावली.

याशिवाय बेस्ट फीमेल अटायर, बेस्ट मेल अटायर, बेस्ट स्पीकर आणि बेस्ट पार्लमेंटेरियन या वैयक्तिक पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. विविध गटांतील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांचा या पुरस्कारांद्वारे गौरव करण्यात आला.

स्पर्धेच्या समारोपानिमित्त आयोजित पारितोषिक वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. रामशेठ ठाकूर, प्रशांत ठाकूर तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी आणि मान्यवर सदस्य उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्या, उपविजेत्या संघांसह वैयक्तिक पुरस्कार विजेत्यांना चषक, धनादेश, पदके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी सर्व स्पर्धकांचे अभिनंदन करत त्यांच्या भावी शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

राज्यभरातील विधी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे "पार्लियामेंटम युवा संसद स्पर्धा २०२६" ही स्पर्धा राज्यातील प्रतिष्ठित युवा संसद स्पर्धांपैकी एक म्हणून पुन्हा एकदा आपली वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली.

# ट्रेलरच्या धडकेत इको कारमधील एकाचा मृत्यू

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नांदगावजवळील ब्रिजजवळ ट्रेलर आणि इको कारच्या भीषण अपघातात इको कारमधील सुशील दामोदर भायदे यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी ट्रेलर चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात ४ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मारुती इको कार (क्रमांक एमएच ०६ बीवाय ८९४१)चे चालक शिवम शंकर ठाकूर (रा. वानदे, मुरुड) हे ४ ऑगस्टला पहाटे साडेचारच्या सुमारास नांदगावजवळील ब्रिजजवळ आले होते. यावेळी त्यांच्या गाडीच्या पुढे जाणाऱ्या ट्रेलरने भरधाव वेगाने अचानक ब्रेक मारला. त्यामुळे मागून येणाऱ्या इको कारने ट्रेलरला जोरदार धडक दिली. या धडकेत इको कारच्या ड्रायव्हरच्या बाजूला बसलेले सुशील दामोदर भायदे गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

अपघातानंतर जखमींना मदत न करता आणि पोलिसांना माहिती न देता ट्रेलरचालक ट्रेलर घेऊन पळून गेला. या अपघातात इको कारचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी ट्रेलर चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त राजिप शाळा चिरवत तुरमाळे येथे विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आल्या. यावेळी मा. सरपंच रविशेठ चोरघे, दत्तात्रेय हातमोडे, ग्रामपंचायत सदस्य शरद वांगीलकर, मीनल चोरघे, निलेश वांगिलकर, निलेश हातमोडे, विशाल गायकर, राजेंद्र हातमोडे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.**

## ‘सीकेटी’च्या एनएसएस युनिटकडून वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय(ज्युनिअर कॉलेज)नवीन पनवेल येथील राष्ट्रीय सेवा योजना अर्थात एनएसएस युनिट च्या वतीने ५ ऑगस्ट रोजी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून इ. ११ वी कला शाखेतील ३५ एनएसएस स्वयंसेवकांनी पनवेल तालुक्यातील दुंदरेपाडा येथील माळरानावर वृक्षारोपण मोहीम राबविली.



सदर मोहिमे अंतर्गत विद्यार्थ्यांनी करंज, बहावा, नारळ, आवळा, आंबा यासारख्या झाडांची लागवड केली. ही सर्व झाडे पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत देण्यात आली होती. वृक्षारोपण मोहिमेस उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

एनएसएस युनिटचे कार्यक्रम अधिकारी निखिलेश देशमुख, गणेश पाटील, विवेक पाटील तसेच अनिता पाटील, योगेश गावडे, शिवदास कांबळे, प्रसाद कंधारे, धनंजय मोकल या सर्वांच्या सहकार्याने आणि सक्रिय सहभागाने वृक्षारोपण मोहिमेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

# मैत्री फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना सायकल वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयातील विद्यार्थ्यांना मैत्री फाउंडेशन बोरिवली(पश्चिम) यांच्या सहयोगातून विद्यालयातील जुई, नौपाडा, कामोठेमधील गरजू २५ विद्यार्थ्यांना मोफत सायकली वाटप करण्यात आल्या.



लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवित आहे. मैत्री फाऊंडेशन बोरिवली (पश्चिम) या संस्थेचे अध्यक्ष राजेश त्रिवेदी, वज्र त्रिवेदी, शिवछत्रपती समाजसेवा मंडळ ज्यूचंद्र, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांच्या सहयोगातून विद्यालयातील जुई, नौपाडा, कामोठेमधील गरजू २५ विद्यार्थ्यांना मोफत सायकली वाटप करण्यात आल्या.

विद्यार्थ्यांचा चालत शाळेत येताना उशीर होणे किंवा प्रवास खर्च लक्षात घेऊन यासाठी काही मदत करता येईल या भावनेने हा उपक्रम घेण्यात आला तसेच सायकल वापरल्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार होता आणि या वेळेचा सदुपयोग त्यांनी अभ्यासाच्या प्रगतीमध्ये करावा असे विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांनी सांगितले.

विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप विद्यालयाचे स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन जयदास गोवारी साहेब, व्हाईस चेअरमन विनायक म्हात्रे, विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व सेवक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत करण्यात आले. पालकांनी व स्कूल कमिटी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व विद्यालयाचे आभार मानले.

## अमरावतीतील पूरग्रस्तांना नवी मुंबईतून मदत

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यातील काही जिल्ह्यांना मुसळधार पावसाने सोडले असताना अमरावतीतील काही भागांमध्ये देखील पूरस्थिती निर्माण झाली आहे. संकट मोठ असलं तरी मदतीचे हातही पुढे येत आहेत. माजी आमदार संदीप नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त संत गाडगेबाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, वाशीम आणि समाजसेवक सागर रामदास म्हात्रे यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती जिल्ह्यातील धमक (ता. नांदगाव खंडेश्वर) येथील पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.



अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या कुटुंबांना तांदूळ, गहू, डाळी, खाद्यतेल, साखर, मीठ, मसाले, बिस्किटे, पिण्याचे पाणी, ब्लँकेट, चादरी, स्वच्छता साहित्य तसेच इतर अत्यावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले.

यावेळी उपस्थितांनी वाढदिवस साजरा करण्यापेक्षा गरजू आणि संकटग्रस्त बांधवांना मदतीचा हात देणे हीच खरी मानवसेवा असल्याचे सांगितले.

## ऐरोलीच्या फिनिक्स पब्लिक स्कूलमध्ये एसटीईएम प्रदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित विषयांबाबत आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने ऐरोली येथील फिनिक्स पब्लिक स्कूलमध्ये एसटीईएम प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक आणि अभियांत्रिकी संकल्पनांवर आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले.



संस्थेचे अध्यक्ष अवनी सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली अभियंता प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते

या उपक्रमाचे उद्‌घाटन प्रादेशिक संचालिका सुजाता मेनन व्यवस्थापन प्रतिनिधी अमित सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. व्यवस्थापन प्रतिनिधी अमित सिंग यांचे मार्गदर्शन लाभले तसेच मुख्याध्यापिका राहेल खंडागळे यांचे मोलाचे योगदान लाभले

प्रदर्शनामध्ये रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्मार्ट सिटी, पर्यावरण संरक्षण, जलसंवर्धन, ऊर्जा बचत, स्वयंचलित यंत्रणा आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेच्या जोरावर विज्ञानाचा दैनंदिन जीवनातील उपयोग प्रभावीपणे मांडला. उद्याचे संशोधक आणि शास्त्रज्ञ घडविण्याचा प्रयत्न संस्थेचा आहे

या प्रदर्शनाला पालक, शिक्षक तसेच विविध क्षेत्रातील अभियंते आणि तज्ज्ञांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे कौतुक केले. अभियंत्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.प्रदर्शनाच्या समारोपप्रसंगी व्यवस्थापनाच्या वतीने सर्व शिक्षक पालक वर्ग व विद्यार्थ्यांचे आभार मानले

# गटारीच्या मेजवानीसाठी खवय्यांची माशांना पसंती

**नवी मुंबई : बातमीदार**

आषाढ दीप अमावास्येनिमित्त साजरी होणाऱ्या गटारीच्या पार्श्वभूमीवर मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि उरण परिसरातील मासळी बाजारांमध्ये खवय्यांची मोठी गर्दी होत आहे. यंदा गटारी बुधवारी (ता. १२) येत असून त्याआधीचा रविवार एकादशी असल्याने अनेकांनी मांसाहारी मेजवानीचा बेत शुक्रवार आणि बुधवारीच आखला आहे. त्यामुळे मासे, चिकन आणि मटणाच्या खरेदीला चांगलाच वेग आला आहे.



किनारपट्टीवरील समुद्रातील मासेमारी बंदीचा कालावधी यंदा १५ ऑगस्टपर्यंत असल्याने मुंबईसह नवी मुंबईच्या कोळीवाड्यानमध्ये स्थानिक ताज्या माशांचा पुरवठा मर्यादित आहे. परिणामी गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक तसेच इतर राज्यांतून येणाऱ्या माशांवरच ग्राहकांना अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे कमी पुरवठा आणि वाढती मागणी यामुळे सुरमई, पापलेट, रावस, बांगडा, कोळंबी आदी माशांच्या दरात सरासरी ३० ते ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. तरीही वाढलेल्या किमतींची पर्वा न करता खवय्यांकडून मोठ्या प्रमाणात खरेदी सुरू असल्याचे चित्र बाजारात दिसून येत आहे.

मुंबईची ओळख असलेली कोळी संस्कृती ही समुद्राशी जोडलेली जीवनपद्धती आहे. पावसाळ्यातील मासेमारी बंदी हा केवळ शासकीय नियम नसून समुद्री जैवसंपत्तीचे संवर्धन, माशांच्या प्रजननाचे संरक्षण आणि भावी हंगाम समृद्ध करण्यासाठी आवश्यक उपाय मानला जातो. या काळात कोळी बांधव नौकांची दुरुस्ती, जाळ्यांची देखभाल आणि नव्या हंगामाच्या तयारीत व्यस्त असतात. त्यामुळे स्थानिक बाजारात ताज्या माशांचा पुरवठा कमी होणे स्वाभाविक असल्याचे मत मत्स्यव्यवसायाशी संबंधित जाणकार व्यक्त करतात.

दरम्यान, भाऊचा धक्का, ससून डॉक, कुलाबा, उरण, अलिबाग परिसरातील मासळी बाजारांमध्ये सकाळपासूनच ग्राहकांची गर्दी होतं असून अनेक ठिकाणी आवडत्या माशांसाठी चढाओढ पाहायला मिळत आहे. व्यापाऱ्यांच्या मते, गटारीच्या आदल्या दिवशी मागणीत आणखी वाढ होण्याची शक्यता असून बाजारपेठा पूर्ण क्षमतेने गजबजणार असल्याचे सुरेखा कोळी यांनी सांगितले.

### सध्याचे दर

**सुरमई – २५०० रु. किलो**
**पापलेट – १५०० रु. किलो**
**कोळंबी – ६०० रु.**
**हलवा – ११०० रु.**
**जिताडा – १८०० रु.**
**बोंबील वाटा ५०० (१२ नग)**

## विजय आर्मी स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

**पनवेल :** विजय आर्मी स्कूल, चिखले येथे गुरुपौर्णिमा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य आर. डी. पाटील होते.प्रमुख पाहुणे म्हणून रुक्मिणीबाई प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी आर. व्ही. पाटील उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी शाळेचे उपप्राचार्य सोपान पाटील व उपमुख्याध्यापक खोंडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षिका पवार, सूर्यवंशी व गावंड यांनी विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेतली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एस. बी. पवार व सूत्रसंचालन देविदास पाटील यांनी केले, तर श्रीमती मोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांनी शिक्षकांना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन केली.

## रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनचा शुभारंभ वर्षाचा भव्य पदग्रहण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनसाठी १ ऑगस्ट २०२६ हा दिवस अत्यंत अभिमानास्पद आणि अविस्मरणीय ठरला. या दिवशी क्लबच्या "शुभारंभ" रोटरी वर्षाचा पदग्रहण समारंभ उत्साहात आणि दिमाखात पार पडला.

या सोहळ्याद्वारे नव्या कार्यवर्षाची अर्थपूर्ण सुरुवात झाली. अध्यक्षा रोटेरियन कोमल गुंडेवार, सचिव रोटेरियन राजेंद्र सक्सेना, खजिनदार रोटेरियन धर्मेश अरोरा तसेच समर्पित संचालक मंडळाने नव्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले जिल्हापाल रोटेरियन नितीन दमाले यांची उपस्थिती क्लबसाठी विशेष गौरवाची बाब ठरली. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी आणि प्रभावी मार्गदर्शनाने "शुभारंभ" या संकल्पनेला नवी दिशा दिली. त्यांच्या भाषणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त उभे राहून दाद देण्यात आली.

या शुभप्रसंगी संचालक मंडळाने परिधान केलेल्या पारंपरिक वेशभूषेमुळे कार्यक्रमाला सांस्कृतिक आणि आकर्षक रंगत लाभला कार्यक्रमास १२२ मान्यवर उपस्थित होते, ज्यामध्ये पाहुणे, रोटेरियन सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांचा समावेश होता. आदरणीय जिल्हापाल आणि सहाय्यक जिल्हापाल यांचे प्रोत्साहन, सहकार्य आणि आशीर्वाद याबद्दल क्लबतर्फे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. हा पदग्रहण सोहळा केवळ औपचारिक कार्यक्रम नव्हता, तर मैत्री, सेवा आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा उत्सव होता. "Service Above Self" या रोटरीच्या ध्येयवाक्याने प्रेरित होऊन समाजात सकारात्मक आणि दीर्घकालीन बदल घडविण्याच्या प्रवासाचा हा खरा शुभारंभ ठरला.




# रायगडातील बहुतांशी धरणे ओव्हरफ्लो!

## सरासरी ९५.८४ टक्के पाणीसाठा उपलब्ध

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पावसाने उशिरा सुरुवात केली, परंतु दमदार पाऊस आजपर्यंत पडत आहे. मोठ्या प्रमाणात धरण क्षेत्रात पाऊस पडल्याने जिल्ह्यातील बहुतांशी धरणे १०० टक्के भरली असून या धरणातून पाण्याचा विसर्ग चालू आहे. सध्या जिल्ह्यातील धरणांमध्ये सरासरी ९५.८४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याचवेळी ७५ टक्क्यांच्या आसपास पाणीसाठा उपलब्ध होता.

रायगड पाटबंधारे विभाग कोलाड अंतर्गत येत असलेल्या २८ धरणांपैकी २४ धरणे १०० टक्के भरली आहेत. या धरणातून कमी जास्त प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. उर्वरित दोन धरणे १०० टक्के भरण्याच्या मार्गावर असून इतर दोन धरणांमध्ये ५० टक्केच्या आसपास पाणीसाठा उपलब्ध आहे. ही धरणेदेखील



१०० टक्के भरतील असा अंदाज आहे.

रायगड जिल्ह्यातील १०० टक्के भरलेल्या धरणांमध्ये मुरुड तालुक्यातील फणसाड, तळा तालुक्यातील वावा, रोहा तालुक्यातील सुतारवाडी, पेण तालुक्यातील आंबेघर, सुधागड तालुक्यातील कोंडगाव, घोटवडे, ढोकशेत, कवेळे, उन्हेरे, श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी, म्हसळा तालुक्यातील पाभरे, संदेरी, महाड तालुक्यातील वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, कर्जत तालुक्यातील साळोख, अवसरे, खालापूर तालुक्यातील भिलवले, कलोते मोकाशी, डोणवत, पनवेल तालुक्यातील मोरबे, बामणोली, उसरण या धरणांचा समावेश आहे.

दुसरीकडे १०० टक्के भरणाच्या मार्गावर असलेल्या धरणांमध्ये अलिबाग तालुक्यातील श्रीगाव ९५ टक्के, उरण तालुक्यातील पुनाडे ९१ टक्के यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील पाणीसाठा कमी असलेल्या धरणांमध्ये श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले ५७, रानीवली ४३ टक्के या धरणांचा समावेश आहे.

# गतिमंद विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव तथा पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा रायगड जिल्ह्याचे उपाध्यक्ष विक्रम साबळे यांच्या माध्यमातून खोपोलीतील सुभाष दोदे मेमोरियल ट्रस्टच्या गतिमंद विद्यार्थ्यांच्या शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला ट्रस्टचे व्यवस्थापक उल्हासराव देशमुख, भाजप खोपोली अध्यक्ष अजय इंगुलकर, जिल्हा व्यापारी संघाचे संजय तन्ना, ज्येष्ठ कार्यकर्ते संजय म्हात्रे, महिला आघाडीच्या रसिका शेटे, गीता मोहिते, सीमा मोगरे, भारती शहा, कामगार आघाडीचे अनिल कर्णूक, राजा धोत्रे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना विक्रम साबळे यांनी, गतिमंद विद्यार्थी हा समाजाचा घटक असून या विद्यार्थ्यांना समाजाने आपलेपणाने जवळ करण्याची गरज आहे. त्यासाठी भविष्यातही अशाच प्रकारची युवा मोर्चातर्फे मदत करण्याचा



संकल्प असल्याचे सांगितले.

भाजप खोपोली अध्यक्ष अजय इंगुलकर यांनी, आमचे नेते आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांतर्गत युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष विक्रम साबळे यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम घेत असल्याचे सांगितले.

# युवा महोत्सवामध्ये मंदार कदमची हॅट्ट्रिक

**धाटाव : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठ आयोजित ५९व्या युवा महोत्सवात प्रथमच सहभाग नोंदवणाऱ्या अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय, माणगावचा विद्यार्थी मंदार रामजी कदम याने बहुआयामी कलागुणांचे अप्रतिम दर्शन घडवत तीन पारितोषिके पटकाविली आहेत.

या युवा महोत्सवात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेत प्रभावी आविष्कार सादर केले. यामध्ये मंदार कदम याने ऑन द स्पॉट पेंटिंग आणि कार्टूनिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक, तर पोस्टर मेकिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. याबद्दल संस्थेचे चेअरमन ॲड. राजीव साबळे, प्राचार्य सोनाली बुर्टे यांनी मंदारसह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांसमवेत अभिनंदन करूत शुभेच्छा दिल्या.



# मुरूड तालुक्यात ८० टक्के भात लावणी पूर्ण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात आतापर्यंत १९२१ मिमी इतका पाऊस पडला असून भात लावणी ८० टक्के पूर्ण झाली आहे. गतवर्षीच्या तुलेनेत यंदा अल निनोच्या कारणास्तव पाऊस कमी पडला. गेल्या वर्षी दमदार पावसामुळे १०० टक्के भात लावणी पूर्ण झाली होती. यंदा हे प्रमाण कमी असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

यंदा बऱ्याच शेतकऱ्यांना धुळ पेरणी फुकट गेल्याने रहू पद्धतीचा वापर करावा लागला. धुळ पेरणीची रोपे थेट जमिनीवर उगवण. झाल्याने आवण जोमदार असते. रहू पद्धतीने तयार केलेले आवण तितकेसे परिणामकारक नसल्याचे शेतकरी दिनेश मिणमिणे यांनी सांगितले.

मुरुड तालुक्यात ३३०० हेक्टर भात लागवडीचे क्षेत्र असून यामध्ये शेतकरी सुवर्णा, जया, रूपाली, चिंटू,



वाडा कोलम, रत्ना, शुभांगी, कर्जत, तर खारपट्ट्यातील जमिनीवर पनवेल व इतर भाताच्या जातीची लागवड करण्यात आली आहे.

भात लावणीच्या कामात यंदाही मजुरांची टंचाई भासत आहे. खरीप हंगामातील भात हे एकमेव पीक असल्यामुळे लावणीसाठी रोजंदारीवर पुरुष आणि महिलाही शेतात राबताना दिसत होत्या. नांगऱ्यांना निपोटी एक हजार रुपये, मजूर पुरुषांना ६००, तर महिलांना ३०० ते ४०० रुपये मजुरी द्यावे लागते.

दरम्यान, भात रोपवाटिका उत्तम प्रकारे तयार झाल्या असून लागवड केलेल्या क्षेत्रातील पिकांची उगवण समाधानकारक आहे. उर्वरित क्षेत्रामध्येही लागवडीची कामे अंतिम टप्प्यात आहे. हवामान अनुकूल राहिल्यास येत्या काही दिवसांत शंभर टक्के लागवड पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

तिसले येथील शेतकरी आदेश भोईर यांच्या शेतावर चारसूत्री पद्धतीने भात लागवड सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना सुधारित भात लागवड तंत्रज्ञान, संतुलित खत व्यवस्थापन, तण नियंत्रण, कीड व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन तसेच नैसर्गिक शेतीविषयक मार्गदर्शन नियमितपणे करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी शेतामध्ये आवश्यक तेवढाच पाण्याचा साठा ठेवावा, पिकांची नियमित पाहणी करावी तसेच कीड किंवा रोगाची लक्षणे आढळल्यास तत्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार व शिफारशीनुसार खतांचा वापर करावा, अनावश्यक रासायनिक फवारण्या टाळाव्यात आणि हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन कृषी कामांचे नियोजन करावे. वेळोवेळी कृषी विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या सूचना व सल्ल्यांचे पालन केल्यास भात पिकाचे उत्पादन व गुणवत्ता वाढण्यास निश्चितच मदत होईल.

# अतिवृष्टीग्रस्तांना नुकसानभरपाई मंजूर

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्याच्या हमरापूर विभागातील खारसापोली येथील रहिवासी राजेश उमाजी म्हात्रे यांचे घर अतिवृष्टीमुळे पूर्ण कोसळले होते. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत एक लाख १३ हजारांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. याच बरोबर निधवली येथील प्रवीण पवार यांच्या घराचेही नुकसान झाल्याने त्यांना एक लाख १३ हजार हजारांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली असल्याचे तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी सांगितले.

रायगड जिल्हा परिषदेचे सभापती वैकुंठ पाटील यांच्या उपस्थितीत तहसील प्रशासनाकडून आर्थिक मदत थेट बँक खात्यात जमा होणार असल्याबाबतचे पत्र अतिवृष्टीग्रस्त राजेश म्हात्रे यांना देण्यात आले.



४ जुलै २०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टीत राजेश म्हात्रे यांचे घर कोसळले होते. यावेळी वैकुंठ पाटील यांनी तत्काळ २५ हजारांची आणि प्रशासनाने पाच हजारांची मदत केली होती. यानंतर करण्यात आलेल्या पंचनाम्याचा अहवाल तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पेण कार्यालयाने शासनाकडे सादर केला होता. महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार नैसर्गिक आपत्ती अंतर्गत नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली असून एक लाख १३ हजार रुपये ही रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात खात्यात जमा होणार आहे.

यावेळी बोलताना सभापती वैकुंठ पाटील यांनी सांगितले की, ही घटना झाल्यानंतर शासनाकडून पाच हजार व मी वैयक्तिक २५ हजारांची मदत केली होती. त्यानंतर आता एक लाख १३ हजार रुपये ही रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात खात्यात जमा होत आहे. या मदतीमुळे नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे नुकसान सहन करणाऱ्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळणार असून शासनाच्या आपत्ती निवारण योजनेंतर्गत मदत वेळेत मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे. नुकसानग्रस्तांना मदत मिळावी यासाठी सदैव प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

# नवोदय विद्यालयाचा स्थापना दिवस साजरा

**माणगाव : बातमीदार**

पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे नवोदय स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. प्रशांत राघमवार, उपप्राचार्य रामजीलाल दधीच तसेच विद्यालयातील शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनी प्राची तिवारी, हार्टा गोरेगावकर आणि वेदिका गुंड यांनी विद्यालयाच्या स्थापनेचे महत्त्व व मूल्ये यांवर मनोगत व्यक्त केले. त्यानंतर मराठी शिक्षक बी.एम. देवरे यांनी विद्यालयाच्या स्थापनेमागील उद्दिष्टे, ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी असलेले त्याचे योगदान आणि शिक्षणातील महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी प्राचार्य डॉ. प्रशांत राघमवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत 'नवोदय'च्या मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन संगीत शिक्षिका सीमा श्रीवास यांनी केले.

दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांसाठी पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या सर्जनशीलतेचे उत्कृष्ट दर्शन घडविले.

# लोखंडे विद्यालयात विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप



**मुरूड : प्रतिनिधी**

प्रत्येक समाजात गरीब, मध्यम वर्गीय व श्रीमंत असे घटक आहेत. शिक्षण घेण्यासाठी ही सर्व मुले शाळेत येत असतात. जे अत्यंत गरीब आहेत त्यांना शिक्षण घेणेसुद्धा कठीण होऊन बसत असते. अशावेळी सामाजिक दायित्व प्रत्येकाने स्वीकारल्यास गरीब घटकातील लोकांना वेळीच मदत मिळून ते सुद्धा विकासाच्या मुख्य प्रवाहात सामिल होऊ शकतात. यासाठी मदत व शैक्षणिक सहाय्य यासाठी प्रत्येक घटकातील व्यक्ती पुढे आल्यास गरीब घटकातील लोकांचा सुद्धा विकास होईल, असे प्रतिपादन जिजाऊ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे यांनी केले.

पिटसई विभाग ज्ञान प्रसारक मंडळाचे अशोक ल. लोखंडे विद्यामंदिर, पिटसई येथील इयत्ता पाचवी ते दहावीतील मधील सुमारे ३०० विद्यार्थ्यांना त्यांच्याकडून मोफत वह्या वाटप करण्यात आले. त्यावेळी सांबरे बोलत होते. ते म्हणाले की, आपल्यातीलच काही विद्यार्थी-विद्यार्थिनी स्पर्धा परीक्षा देऊन पुढे पुढे गेले तर तुमचा सत्कार करण्याची मला संधी आपण द्याल अशी मी आशा बाळगतो.

या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त महादेव गोळे, अध्यक्ष गणपत जगताप, उपाध्यक्ष मनोहर गायकवाड, ज्येष्ठ सदस्य कृष्णा पंदेरे, खेळू वाजे, दीपक शिगवण, राजू थिटेकर, रमेश पिंपळे, राजेंद्र भोरावकर, केशव शिंगाडे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रदुम्न ठसाळ, शहर प्रमुख राकेश वडके, जिल्हा कोअर कमिटी सदस्य लीलाधर खातू, नगरसेवक शिराज खाचे, रितेश मुंढे, नमित पांढरकामे, नरेश सुर्वे, मांडवकर, जिजाऊ संघटनेचे पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अकील मुलाणी, ज्येष्ठ शिक्षक सुखदेव सवईसर्जे, इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयातील शिक्षक सुनील तेलंगे यांनी केले.

# कोलाड-रोहा रस्त्यावरील गतिरोधकांना पट्टे मारण्याची गरज

**रोहा : प्रतिनिधी**

कोलाड-रोहा मार्गावर गतिरोधकांवरील सफेद-पिवळे पट्टे गायब झाले आहेत. त्यामुळे अंधारात हे गतिरोधक न दिसल्याने अपघाताला निमंत्रण मिळत आहे तसेच वाहने आदळत असल्याने चालकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

वाहनचालकांच्या वेगावर नियंत्रण रहावे यासाठी कोलाड-रोहा रस्त्याला डॉ. गांधी हॉस्पिटलपासून ठरविक अंतरावर गतिरोधक बसविण्यात आले आहेत. हा मार्ग रोहा तालुक्याला जोडणारा असून या मार्गावर धाटाव येथे एमआयडीसी आहे. शिवाय मुरुड, अलिबागवरून भिरा-ताम्हिणीमार्गे पुण्याकडे जाणारा राष्ट्रीय मार्ग आहे. यामुळे या मार्गावर सतत वाहनांची वर्दल सुरु असते, पण या रस्त्याला बसविण्यात आलेल्या गतिरोधकांना सफेद व पिवळे पट्टे नसल्याने अपघात होताना दिसत आहेत, तर दुचाकी चालवत असताना गतिरोधकावरून गाडी उडण्याचा प्रकार घडत आहेत. ते पाहता गतिरोधकांना पांढरे व सफेद पट्टे लावून इतर उपाययोजना करावी, अशी मागणी वाहनचालक व प्रवासीवर्गातून होत आहे.



# नागोठणे येथे मोफत नेत्रचिकित्सा शिबिर

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष विलास चौलकर यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक कार्यकर्त्या कै. अंजली गणपत जोगत यांच्या स्मरणार्थ त्यांचे पुत्र प्रसाद जोगत व शेखर जोगत यांच्या सौजन्याने, लायन्स हेल्थ फाऊंडेशन व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, चोंढी (अलिबाग) यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यान, शांतीनगर, नागोठणे येथे मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते.




शिबिरास लायन्स क्लबचे अध्यक्ष विलास चौलकर, किशोर जैन, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या कार्यकारी अधिकारी डॉ. शुभदा कुडतळकर, चार्टर्ड प्रेसिडेंट प्रकाश जैन, एमजेएफ यशवंत चित्रे, विवेक सुभेकर, सचिव डॉ. अनिल गीते, सामाजिक कार्यकर्ते प्रसाद जोगत, शेखर जोगत, दौलत मोदी, सखाराम ताडकर, विजय शहासने, दीपक गायकवाड, दीपक लोणारी, रतन हेंडे, अनुराधा शहासने, विद्या म्हात्रे, रवींद्र वाजे, डॉ. हिताली परब व त्यांची टीम तसेच नागोठणे शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना किशोर जैन म्हणाले की, नागोठणे ग्रामपंचायतीमार्फत लायन्स क्लबला सामाजिक उपक्रमांसाठी स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यान उपलब्ध करून देण्यात आले असून त्या विश्वासाचे चीज करत लायन्स क्लब सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे. भविष्यात परिसरातील मोठ्या उद्योगसमूहांच्या सीएसआर निधीचा प्रभावी वापर करून नागोठण्यात अत्याधुनिक मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशील राहू. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विवेक सुभेकर यांनी केले.

शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ६६ नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली असून त्यापैकी ४० रुग्णांमध्ये मोतीबिंदू आढळून आला. या सर्व रुग्णांवर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, चोंढी (अलिबाग) येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

# खानावमध्ये साकव कामाला प्रारंभ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग-रोहा मुख्य मार्गावरील खानाव येथील धोकादायक बनलेल्या साकव पुलाच्या नूतनीकरणाच्या कामाला प्रारंभ झाला आहे. याचा शुभारंभ शिवसेना अलिबाग तालुकाप्रमुख तथा जिल्हा परिषद सदस्य अनंत गोंधळी यांच्या हस्ते करण्यात आला.

अलिबाग-रोहा मुख्य रस्ता नुकताच नव्याने तयार करण्यात आला असला, तरी खानाव येथील साकव पुलाला ऐन पावसाळ्यात भगदाड पडल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. या भगदाडामुळे घडलेल्या अपघातात एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यामुळे या पुलाचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत होती. या पार्श्वभूमीवर जि.प. सदस्य अनंत गोंधळी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करून कामाला गती दिली.



# अजिंक्य रहाणेची नवी इनिंग!

## युरोपियन टी-२० प्रीमियर लीगमध्ये खेळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय आणि भारतीय देशांतर्गत क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर अवघ्या काही दिवसांत भारताचा माजी खेळाडू अजिंक्य रहाणे नव्या स्पर्धेत खेळताना दिसणार आहेत. अजिंक्यने युरोपियन टी-२० प्रीमियर लीग (ईटीपीएल)मधील ॲमस्टरडॅम फ्रेम्स संघाशी करार केला असून या स्पर्धेच्या पहिल्या हंगामात तो संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

अजिंक्य रहाणेने ३० जुलै रोजी आंतरराष्ट्रीय तसेच भारतीय देशांतर्गत क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. त्यानंतर परदेशातील फ्रँचायझी लीगमध्ये खेळण्याचा मार्ग त्यांच्यासाठी खुला झाला आहे.



या करारानंतर अजिंक्य रहाणे म्हणाला की, क्रिकेटने मला खूप काही दिले आहे. खेळाडूंनी खेळाला अधिक समृद्ध करून पुढे नेण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. युरोपमध्ये क्रिकेटचा वेगाने विकास होत आहे आणि त्याचे भवितव्य उज्ज्वल आहे. ॲमस्टरडॅम फ्रेम्सची दीर्घकालीन दृष्टी आणि क्रिकेटच्या विकासासाठीची बांधिलकी मला आवडली. या संघासोबत काम करण्यास आणि युरोपमधील पुढच्या पिढीला प्रेरणा देण्यास मी उत्सुक आहे.

युरोपियन टी-२० प्रीमियर लीगचा पहिला हंगाम २६ ऑगस्ट ते २० सप्टेंबरदरम्यान होणार आहे. ही स्पर्धा नेदरलँड्स, आयर्लंड आणि स्कॉटलंड क्रिकेट बोर्डांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून यामध्ये अनेक आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू आणि दिग्गज खेळाडू विविध भूमिकांमध्ये सहभागी आहेत. अजिंक्य रहाणेही या स्पर्धेशी जोडला गेला आहे.

अजिंक्यने भारताकडून ८५ कसोटी, ९० वनडे आणि २० टी-२० सामने खेळला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याने ८४००हून अधिक धावा केल्या, तर आयपीएलमध्ये २००हून अधिक सामन्यात पाच हजारांहून अधिक धावा केल्या आहेत.

### *स्टीव्ह वॉकडून निर्णयाचे स्वागत*

*ॲमस्टरडॅम फ्रेम्सचा सहसंस्थापक आणि ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार स्टीव्ह वॉर्नने अजिंक्य रहाणेचे स्वागत केले. अजिंक्यकडे कौशल्य, संयम, नेतृत्व करण्याची क्षमता आहे. त्याचा अनुभव टीमसाठी अमूल्य ठरेल आणि विजयी मालिका सुरू करण्यात मोठी मदत करेल, असे तो म्हणाला, तर रहाणेसारखा अनुभवी खेळाडू या स्पर्धेचा दर्जा उंचावेल आणि युरोपमधील क्रिकेटपटूंना प्रेरणा देईल, अशी प्रतिक्रिया ईटीपीएल सहमालक अभिषेक बच्चनने दिली आहे.*

# टी-२०मध्ये जोस बटलर अव्वल

## पोलार्डला मागे टाकून सर्वाधिक धावांचा मानकरी

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा माजी कर्णधार आणि स्फोटक फलंदाज जोस बटलरने टी-२० क्रिकेटच्या इतिहासात आपले नाव सुवर्णअक्षरांनी कोरले आहे. वेस्ट इंडिजचा अष्टपैलू खेळाडू किएरॉन पोलार्डचा सर्वात मोठा विक्रम मोडीत काढत जोस बटलर आता टी-२० क्रिकेटमध्ये जगात सर्वाधिक धावा करणारा पहिल्या क्रमांकाचा फलंदाज बनला आहे.



द हंड्रेड स्पर्धेत मँचेस्टर सुपर जायंट्स आणि वेल्श फायर यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्यादरम्यान बटलरने हा ऐतिहासिक टप्पा पार केला. सामन्यापूर्वी बटलरला पोलार्डचा १४,८०३ धावांचा जागतिक विक्रम मोडण्यासाठी केवळ २२ धावांची गरज होती. मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर १५६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना बटलरने २० चेंडूंत नाबाद ५१ धावांची उत्कृष्ट खेळी केली. या खेळीदरम्यान ६२व्या चेंडूवर धाव घेताच तो टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. आता त्याच्या नावावर ४९२ डावांमध्ये १४,८३३ धावा जमा झाल्या आहेत.

बटलरच्या नेतृत्वाखाली इंग्लंडने २०२२मध्ये आयसीसी टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्याने आतापर्यंत १६० आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांमध्ये ४,२१२ धावा केल्या आहेत. त्याचप्रमाणे आयपीएलमध्ये तो मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स या संघांकडून खेळला आहे. आयपीएलमध्ये त्याच्या नावावर सात शतके आणि २८ अर्धशतकांच्या मदतीने ४,६४६ धावा नोंद आहेत.

# पाकिस्तानी खेळाडूवर दोन वर्षांची बंदी अन् १० लाखांचा दंड

**लाहोर : वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) शिस्तभंगाच्या आणि नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी एका खेळाडूवर कठोर कारवाई केली आहे. पाकिस्तानचा देशांतर्गत क्रिकेटपटू हमजा नझर याच्यावर चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती देऊन व्हिसा अर्ज केल्याप्रकरणी दोन वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय त्याच्यावर १० लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या माध्यमातून व्हिसासाठी अर्ज करताना हमजा नझरने अपूर्ण, खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती दिली होती. ही बाब उघडकीस आल्यानंतर पीसीबीने याची गंभीर दखल घेत एक तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली. या समितीने संपूर्ण प्रकरणाचा सखोल आढावा घेतला आणि हमजाला आपली बाजू मांडण्याची संधीही दिली. चौकशीत दोषी आढळल्यानंतर पीसीबीने त्याच्यावर ही कारवाई केली आहे. या दोन वर्षांच्या बंदीमुळे हमजा नझर आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटसह देशांतर्गत क्रिकेटमधील कोणत्याही स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही.

२७ वर्षीय हमजा नझर हा पाकिस्तानमधील एक अष्टपैलू क्रिकेटपटू आहे. त्याने अद्याप पाकिस्तानसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण केलेले नाही. बोर्डाने स्पष्ट केले आहे की, क्रिकेटच्या नियमांशी विसंगत असणारे आणि बोर्डाची प्रतिमा मलीन करणारे वर्तन अजिबात खपवून घेतले जाणार नाही.

# युवा गोलंदाजाची अचानक निवृत्ती



**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा युवा वेगवान गोलंदाज जॉन टर्नर याने वयाच्या २५व्या वर्षी आंतरराष्ट्रीय आणि व्यावसायिक क्रिकेटमधून तडकाफडकी निवृत्ती जाहीर केली. पाठीच्या तीव्र दुखापतीमुळे तो गेल्या वर्षभरापासून मैदानापासून दूर होता.

दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे जन्मलेल्या टर्नरकडे ब्रिटिश पासपोर्ट असल्याने तो युकेमध्ये शिक्षणासाठी गेला. युनिव्हर्सिटी ऑफ एक्सेटरमधून इकॉनॉमिक्स आणि फायनान्सचे शिक्षण घेत असतानाच त्याने क्रिकेटमध्ये छाप पाडली. २०२१मध्ये हॅम्पशायर क्लबशी जोडल्या गेलेल्या टर्नरने देशांतर्गत क्रिकेट आणि द हंड्रेड स्पर्धेत आपल्या वेगाने सर्वांचे लक्ष वेधले. या कामगिरीच्या जोरावर २०२३मध्ये त्याला पहिल्यांदा इंग्लंडच्या राष्ट्रीय संघात स्थान मिळाले. त्याने २०२४मध्ये वेस्ट इंडिज दौऱ्यावर इंग्लंडसाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. अल्पशा कारकिर्दीत त्याने दोन एकदिवसीय आणि दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळताना तीन विकेट्स घेतल्या आहेत.

# बुमराहला विश्रांती देऊन शमी, भुवनेश्वरला संघात परत आणा!

## माजी क्रिकेटपटू करसन घावरीचा सल्ला

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याच्या दुखापती आणि वर्कलोड मॅनेजमेंटचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दुखापतीमुळे १५ ऑगस्टपासून श्रीलंकेविरुद्ध सुरू होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतून बुमराह बाहेर पडला आहे. या पार्श्वभूमीवर भारताचे माजी वेगवान गोलंदाज करसन घावरी यांनी भारतीय निवडकर्त्यांना आणि संघ व्यवस्थापनाला एक मोठा आणि महत्त्वाचा सल्ला दिला आहे.

बुमराहला काही काळासाठी विश्रांती देण्यात यावी तसेच अनुभवी गोलंदाज मोहम्मह शामी, भुवनेश्वर कुमार यांना संघात परत आणावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.



"बुमराहने पाच-सहा महिने किंवा अगदी एक वर्षाचा ब्रेक घेऊन पूर्णपणे १०० टक्के फिटनेस मिळवला पाहिजे. सर्वात मोठी समस्या अशी आहे की, तो पूर्णपणे तंदुरुस्त नसतानाही मोठ्या स्पर्धांमध्ये उतरतो आणि मग वर्कलोड वाढल्यामुळे स्पर्धेच्या मध्यभागीच त्याला दुखापत होते. हे अनावश्यक आहे. तो जर संपूर्ण स्पर्धेत आपला वर्कलोड सांभाळू शकत असेल, तरच त्याला संघात निवडले पाहिजे. गेल्या दोन-तीन वर्षांपासून बुमराह सातत्याने दुखापतींमुळे संघाच्या आत-बाहेर होत असून तो संपूर्ण मालिका क्वचितच खेळू शकला आहे, जी भारतीय संघासाठी चिंतेची बाब आहे," असे घावरी यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, बुमराहवरील ताण कमी करण्यासाठी आणि भारतीय गोलंदाजीला बळ देण्यासाठी अनुभवी गोलंदाज मोहम्मद शमी आणि भुवनेश्वर कुमार यांना संघात परत आणावे. दोघेही दोघेही आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये कोणत्याही दुखापतीशिवाय सातत्याने अप्रतिम कामगिरी करत आहेत. निवडकर्त्यांनी त्यांचा नक्कीच विचार करायला हवा.

शमीने गेल्या रणजी हंगामात बंगालकडून तब्बल ३७ बळी घेतले होते, तर भुवनेश्वर कुमारने आयपीएल २०२६च्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजेतेपदात २८ बळी घेण्याची दमदार कामगिरी करून दाखवली.

### फॉर्मेटनुसार गोलंदाजांना संधी द्या

घावरी यांच्या मते, बुमराहने तिन्ही फॉर्मेट खेळणे शक्य नाही. त्यामुळे त्याला प्रामुख्याने कसोटी क्रिकेटसाठी मर्यादित ठेवून मोहम्मद सिराजला शमी आणि भुवनेश्वरची साथ द्यावी. भुवनेश्वर कुमारचा आयपीएलमधील अनुभव पाहता त्याचा वापर टी-२०मध्ये करावा, तर कसोटी सामन्यांमध्ये सिराज आणि मोहम्मद शमी यांची अदलाबदल करून वापर करावा, जेणेकरून बुमराहवरील दडपण कमी होईल.

# विल जॅक्सने टिपला भन्नाट कॅच



**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडमधील द हंड्रेड स्पर्धेत गुरुवारी लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर पार पडलेल्या सामन्यात एमआय लंडन संघाने लंडन स्पिरीटचा चार गडी राखून पराभव केला. पहिल्या डावात लंडन स्पिरीटने १०० चेंडूंमध्ये १६० धावा केल्या. प्रत्युत्तरात सिकंदर रझाने १६ चेंडूंत ३२ धावांची खेळी करत आणि विल जॅक्सने सीमारेषेवर भन्नाट झेल टिपत एमआय लंडनला ९४ चेंडूंत विजय मिळवून दिला.

इंग्लंडमध्ये सध्या द हंड्रेड क्रिकेट लीग स्पर्धेचा थरार सुरु आहे. या स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक थरारक सामने पाहायला मिळाले आहेत. गुरुवारी झालेल्या सामन्यात लंडन स्पिरीट आणि एमआय लंडन हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात एमआय लंडन संघाने चार गडी राखून विजयाची नोंद केली. एमआयला हा सामना जिंकून देण्यात सिकंदर रझाने मोलाची भूमिका बजावली, तर क्षेत्ररक्षण करताना विल जॅक्सने बाऊंड्रीलाईनवर भन्नाट झेल घेतला. ज्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या लंडन स्पिरीट संघाने १०० चेंडूंमध्ये पाच गडी बाद १६० धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या एमआय लंडन संघाने ९४ चेंडूंमध्ये दिलेले आव्हान पूर्ण केले आणि सहा गडी राखून विजयाची नोंद केली.

# फुटबॉल सामन्यादरम्यान वीज कोसळून खेळाडूचा मृत्यू, १२ जण जखमी

**बँकॉक : वृत्तसंस्था**

थायलंडमध्ये सुरू असलेल्या स्थानिक फुटबॉल सामन्यादरम्यान घडलेल्या दुर्दैवी घटनेत २४ वर्षीय खेळाडूचा वीज कोसळून मृत्यू झाला आहे. या अपघातात आणखी १२ खेळाडू जखमी झाले असून या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार दक्षिण थायलंडमध्ये स्थानिक एफए कप फुटबॉल स्पर्धेतील सामना सुरू असताना मुसळधार पाऊस सुरू होता. याचवेळी २४ वर्षीय सोफवान अवाए हा खेळाडू मैदानात खेळत असताना अचानक त्याच्यावर वीज कोसळली. सहकाऱ्यांनी तातडीने त्याच्याकडे धाव घेतली, मात्र त्याची प्रकृती गंभीर होती. स्थानिक आपत्कालीन वैद्यकीय पथकाने घटनास्थळी पोहचून त्याच्यावर उपचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र विजेचा जबरदस्त धक्का बसल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटनेत मैदानावरील इतर १२ खेळाडूंनाही दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले.






# विराट कोहलीचा जबरदस्त डाइट प्लॅन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या मैदानावर विक्रमांची मालिका रचणारा विराट कोहली केवळ जगातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक नाही, तर फिटनेसचेही जागतिक प्रतीक बनला आहे. आज लाखो तरुण त्याला त्याच्या खेळासाठी नाही, तर त्याच्या शिस्तबद्ध जीवनशैलीमुळेही फॉलो करतात.

एक काळ असा होता की विराटचे वजन जास्त असल्याने त्याला मित्रमंडळी प्रेमाने 'चीकू' म्हणायची, पण २०११नंतर त्याने केलेल्या जबरदस्त फिटनेस ट्रान्सफॉर्मेशनने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.

विराटने विविध मुलाखतींमध्ये आपल्या आहाराच्या सवयींबाबत अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यातून फिटनेससाठी आवश्यक असलेली शिस्त, सातत्य आणि आत्मनियंत्रण स्पष्ट दिसून येते.





विराटच्या मते, यशस्वी फिटनेसचा पाया म्हणजे सातत्य. तो म्हणतो, मी सलग सहा महिने दिवसातून तीन वेळा एकच पदार्थ खाऊ शकतो. त्याचा मला कंटाळा येत नाही. त्याच्या या वक्तव्यातून फिटनेससाठी चवीपेक्षा ध्येयाला प्राधान्य देण्याची मानसिकता दिसून येते.

विराटच्या आहारात सुमारे ९० टक्के अन्न वाफवलेले किंवा उकडलेले असते. त्यात जास्त मसाले नसतात. फक्त मीठ, मिरी आणि लिंबाचा वापर केला जातो. विराटने सांगितले की, त्याला सॅलड, हलक्या ड्रेसिंगसह भाज्या, पॅन-ग्रिल्ड पदार्थ आणि ऑलिव्ह ऑइलमध्ये बनवलेले अन्न आवडते तसेच पंजाबी असल्यामुळे डाळ, राजमा हे पदार्थ तो अजूनही आवडीने खातो.

**आहाराचे नियोजन फिटनेसचा मंत्र**

फिटनेस म्हणजे फक्त व्यायाम नाही, तर योग्य आहाराचे नियोजनही आहे, असे विराट मानतो. तो म्हणतो, जर तुम्ही बहुतांश वेळा तुमच्या चवीवर नियंत्रण ठेवले, तर फिटनेस नक्की मिळू शकतो. पाच टक्के वेळा आवडीचे काहीही खा, पण उर्वरित ९५ टक्के वेळा शरीरात काय जातेय, त्याचा शरीरावर काय परिणाम होणार आहे, याची मला पूर्ण कल्पना असते." विराटच्या फिटनेसचा गाभा हा कोणत्याही जादुई डाइटमध्ये नसून शिस्त, सातत्य, नियंत्रित आहार आणि नियमित व्यायाम यामध्ये आहे. चव, मोह आणि क्षणिक इच्छा यांवर नियंत्रण ठेवून दीर्घकालीन आरोग्याला प्राधान्य देणे हाच त्याच्या यशामागचा खरा मंत्र आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com